घड्याळ म्हंटल की..
विठ्ठल वॉच
नामवंत कंपन्यांची घड्याळे
मिळतील विक्री व दुरूस्ती

सुधाकर कॉम्पलेक्स,नगरपलिकेसमोर
मायणी रोड,विटा (जि.सांगली)
८२६२८३५३९१-९४२१२२१६३०

प्रीतिसंगम

www.pritisangam.com

सातारा-सांगली-कोल्हापूर-पुणे-सोलापूर

श्री चैतन्य टेस्ट ट्युब बेबी सेंटर
तुमच्या मातृत्वाच्या स्वप्नांना आमची साथ..!
आपले आई-बाबा होण्याचे स्वप्न आता पूर्ण होईल!

११
६०००+
» मातृत्वाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आजच संपर्क करा! «
8484-86-1900
» शाखा «
बारामती | सातारा | अहिल्या नगर

वर्ष २९ वे | अंक २९३ | पाने ४ | शुक्रवार | दि. ५ डिसेंबर २०२५ | किंमत २ रूपये | R.N.I.No.MAHMAR./2001/10338 पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 | फोन-२२७७२५

मित्राचे स्वागत करुन आनंद झाला:पंतप्रधान नरेंद्र मोदी

रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतिन भारतात दाखल

नवी दिल्ली/वृत्तसंस्थाः-
रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिनभारतात दाखल झाले आहेत. त्यांच्या स्वागतासाठी स्वतः पंतप्रधान मोदी दिल्लीतील पालम विमानतळावर उपस्थित होते. पुतिन विमानातून खाली उतरताच पीएम मोदींनी आलिंगन देत त्यांचे स्वागत केले. रशिया-युक्रेन युद्ध सुरू झाल्यानंतर आणि भारत-अमेरिकेत तणाव सुरू झाल्यानंतर पुतिन यांचा हा पहिलाच भारत दौरा आहे. त्यामुळे संपूर्ण जगाचे या दौऱ्याकडे लक्ष लागले आहे.

दरम्यान, राष्ट्राध्यक्ष पुतिन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी विमानतळावरुन एकाच गाडीतून झच् निवासस्थानी पोहोचले. एकाच कारमधून प्रवास करण्याची ही त्यांची दुसरी वेळ आहे. तीन महिन्यांपूर्वी चीनमध्ये झालेल्या शिखर परिषदेदरम्यान, दोन्ही नेत्यांनी पुतिन यांच्या कारमधून प्रवास केला होता. पीएम मोदींनी आपल्या एक्स(ट्विटर) अकाउंटवर पुतिन यांच्या स्वागताचे आणि कारमधून एकत्र प्रवास केल्याचे फोटो शेअर केले आहेत.

माझा मित्र राष्ट्राध्यक्ष पुतिन यांचे भारतात स्वागत करुन मला खूप आनंद होत आहे. आज संध्याकाळी आणि उद्या होणाऱ्या चर्चेबाबत मी उत्सुक आहे. भारत-रशिया मैत्रीने नेहमी दोन्ही देशांच्या लोकांच्या अपेक्षा पूर्ण केल्या आहेत, अशी प्रतिक्रिया पीएम मोदींनी आपल्या एक्स पोस्टमधून व्यक्त केली. दरम्यान, पीएम मोदींनी पुतिन यांच्यासाठी पंतप्रधान कार्यालयात विशेष डिनरचे आयोजन केले आहे.

पुतिन यांचा हा दौरा भारत-रशिया रणनीतिक संबंधांना २५ वर्षे पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर विशेष महत्त्वाचा ठरतो. २००० मध्ये पुतिन आणि तत्कालीन पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी या रणनीतिक भागीदारीला औपचारिक स्वरूप दिले होते.

भारताने रशियासोबत ऊर्जा, संरक्षण आणि व्यापार क्षेत्रात मजबूत संबंध राखले आहेत, तर दुसरीकडे पश्चिम देशांशीही तटस्थ व संतुलित भूमिका निभावली आहे. पुतिन यांचा दौरा या संतुलनाला अधिक बळकटी देऊ शकतो.

S-४०० मिसाइल प्रणाली, जहाजबांधणी, ऊर्जा सहकार्य आणि अणुऊर्जा प्रकल्प या क्षेत्रांमध्ये महत्त्वाच्या घोषणांची शक्यता आहे.



बांधकाममंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी आपल्या मुलीच्या लग्न सोहळ्यात सामाजिक बांधिलकीजपत मुख्यमंत्री सहाय्यता निधीला धनादेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुपूर्द केला योवळी वधू व वर आणि श्री.छ.खा.उदयनराजे भोसले.

विवाह सोहळ्यातून सामाजिक बांधिलकीचे दर्शन

मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी मुख्यमंत्र्यांकडे दिली १० लाखांची मदत

सातारा/प्रतिनिधी:-
सातारा येथे कन्येच्या संपन्न झालेल्या विवाह सोहळ्यात सार्वजनिक बांधकाम मंत्री आणि लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री श्रीमंत छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी एक अत्यंत अभिनंदनीय पाऊल उचलून सामाजिक बांधिलकीचे अनोखे दर्शन घडवले. कन्या ऋणालीराजे भोसले आणि चिरंजीव रविराज देशमुख यांच्या शुभविवाह प्रसंगी त्यांनी लातूर जिल्ह्यातील ओल्या दुष्काळग्रस्तांसाठी १० लाख रुपयांचा निधी मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुपूर्द केला.

शेंद्रे, ता. सातारा येथील अजिंक्यतारा साखर कारखाना परिसरात झालेल्या या विवाह सोहळ्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह विविध खात्याचे आजी माजी मंत्री महोदय, आमदार आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

विवाह सोहळया संपन्न झाल्यानंतर ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी नव वधू आणि वराच्या हस्ते मुख्यमंत्र्यांना दहा लाख रुपयांचा धनादेश प्रदान केला, जो लातूरमधील ओल्या दुष्काळग्रस्तांना मदत म्हणून वापरला जाणार आहे. त्यांच्या या कृतीचे उपस्थितांनी विशेष कौतुक केले. लग्नासारख्या कौटुंबिक आणि आनंददायी सोहळ्याच्या माध्यमातून समाजाप्रती असलेली जबाबदारी जपण्याचा हा प्रयत्न निश्चितच प्रेरणादायी आहे. ओल्या दुष्काळाच्या संकटात सापडलेल्या लातूर जिल्ह्यातील जनतेसाठी हा निधी मोठा आधार ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

या विवाह सोहळ्यामध्ये अनेक राजकीय आणि सामाजिक क्षेत्रांतील महत्त्वाच्या व्यक्ती उपस्थित होत्या. या सर्वांसमोर भोसले यांनी केलेली ही मदत सामाजिक उत्तरदायित्वाची आणि नेतृत्वाची प्रखर जाणीव करून देणारी आहे. त्यांच्या या उदात्त कृतीमुळे समाजात एक सकारात्मक संदेश गेला आहे.

कर्जबुडव्या साखर कारखान्यांवर कारवाईचा बडगा; अनेकांवर आरआरसी जारी

सहकारमंत्री बाबासाहेब पाटील:यशवंतराव चव्हाण यांच्या समाधीस्थळी केले अभिवादन

कराड/प्रतिनिधीः-
राज्यातील कर्जबुडव्या सहकारी साखर कारखान्यांवर सरकारने कारवाईची गती वाढवली असून, मोठ्या प्रमाणातील अनुत्पादक कर्जे घेतलेल्या आणि एफआरपी न दिलेल्या अनेक कारखान्यांवर आरआरसी (जमाक्रिया प्रक्रिया) काढण्यात आल्याची माहिती सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी दिली. अजूनही अशा कारखान्यांची नावे असतील तर द्या, त्यांच्यावरही निश्चित कारवाई करू, असा ठाम इशारा त्यांनी दिला.

येथील यशवंतराव चव्हाण यांच्या समाधीस्थळी अभिवादन केल्यानंतर माध्यमांशी ते संवाद साधत होते. यावेळी आमदार विक्रम काळे, राष्ट्रवादीचे नेते उदयसिंह पाटील-उंडाळकर, राजेश पाटील - वाठारकर, प्रा. शरद काटकर यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

राज्यातील काही सहकारी साखर कारखाने भरमसाठ कर्ज उचलतात, ढिसाळ व्यवस्थापनामुळे कारखाने डबघाईला येऊन कर्ज बुडवतात, यामध्ये शेतकऱ्यांचे नुकसान होते. अशा कारखान्यांवर काय कारवाई करणार आहात? या प्रश्नावर बोलताना त्यांनी अशा कारखान्यांची नावे द्यावीत, त्यांच्यावर नक्कीच कारवाई करू. या संदर्भातील आमच्याकडे नावे आलेल्या कारखान्यांवर आम्ही कारवाई करत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पान ४ वर

मिक्सर ट्रकची दुचाकीला भीषण धडक

सातारा/प्रतिनिधीः-
साताऱ्यातील बॉम्बे रेस्टॉरंट ते अजंठा चौक या सर्व्हिस रोडवर दि. ३ रोजी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास मिक्सर ट्रकने दुचाकीला समोरून धडक दिली. या अपघातात दुचाकी चालक गंभीर जखमी झाला आहे. या अपघातप्रकरणी अज्ञात ट्रक चालकाविरुध्द सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

अल्पवयीन मुलाला गंडा घालणाऱ्या शिक्षकासह एकास अटक

कराड/प्रतिनिधीः-
विद्यानगर/सैदापूर (कराड) येथील एका शिक्षकाच्या सांगण्यावरून अल्पवयीन मुलाने चोरलेले सोळा तोळे सोन्याचे दागिने शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करण्यासाठी संबंधित शिक्षकाकडेच ठेवायला दिले. याप्रकरणी कराड शहर पोलिसांनी संबंधित अल्पवयीन मुलाला ताब्यात घेतल्यानंतर सर्व प्रकार उघड झाला.

पोलिसांनी आरोपी शिक्षक वैभव सुभाष वाघमारे (वय ३०), रा. विद्यानगर/सैदापूर याच्यासह अभिजित सुभाष बोरडे (वय ३१), रा. निमसोड, ता. कडेगाव या दोघांना अटक केली असून, चोरीचे सर्व दागिनेही पोलिसांनी हस्तगत केले आहेत.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, वैभव वाघमारे हा विद्यानगर/सैदापूर परिसरात खाजगी क्लासेस चालवत होता. शिक्षकाने संबंधित मुलाला कमी कष्टात जास्त पैसे मिळू शकतात, असे आमिष दाखवले. त्याला भुलून मुलाने विद्यानगर येथील स्वतःच्या घरातून १६.३३ तोळे सोने चोरी केले. ते सोने त्या मुलाने शिक्षक वाघमारेकडे ठेवायला दिले. चोरीचा हा प्रकार संबंधित कुटूंबियांच्या उशिरा लक्षात आला. चोरी झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर त्यांनी याबाबत कराड शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्यानंतर पोलिसांनी अल्पवयीन मुलाला चौकशीसाठी ताब्यात घेतले. यावेळी त्याने घडलेली सर्व हकीकत पोलिसांना सांगितली.

पोलिसांनी क्लासचा शिक्षक वैभव वाघमारे याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता वाघमारे याने अल्पवयीन मुलाने दिलेले दागिने अभिजित बोरडे याच्या मदतीने बोरडे याच्या ढवळेश्वर, ता. खानापूर येथील घरी ठेवले असल्याची माहिती पोलिसांना दिली. पोलिसांनी संबंधित ठिकाणी जाऊन घरातील लोखंडी कपाटातून आरोपीने ठेवलेल्या बॉक्समधून सोन्याचे गंठण, सोन्याची चैन, नेकलेस, राणी हार पंचासमक्ष जप्त केला. पोलिसांनी वाघमारे व बोरडे या दोघांना अटक केली असून, अधिक तपास सुरू आहे.

ईव्हीएम मशीन गोडाऊनमध्ये डबल डोअर लॉक पद्धतीने सील

पालिका मुख्याधिकारी विनोद जळक यांची माहिती

सातारा/प्रतिनिधीः-
सातारा शहरातील १५६ मतदान केंद्रावर मतदान प्रक्रियेसाठी राबवण्यात आलेले ईव्हीएम मशीन कोडोली येथील वखार महामंडळाच्या गोडाऊनमध्ये ठेवण्यात आले आहेत .सदर गोदाम तेथे उपस्थित असलेले उमेदवार तसेच त्यांचे प्रतिनिधी यांच्या समक्ष डबल डोर लॉक पद्धतीने सील करण्यात आले असून याबाबतच्या लॉग बुक मध्ये त्यांची स्वाक्षरी नोंदवण्यात आलेली आहे .अशी माहिती सातारा पालिका मुख्याधिकारी विनोद जळक यांनी दिली.

याबाबत मुख्याधिकाऱ्यांनी प्रसिद्धी पत्रक काढून याबाबत माहिती दिली आहे .या पत्रकात नमूद आहे की २ डिसेंबर रोजी सातारा शहरात १५६ मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रिया राबवण्यात आली होती मतदान केंद्रावरून प्राप्त झालेल्या ईव्हीएम मशीन एमआयडीसी कोडोली येथील शासकीय गोदामात ठेवण्यात आलेले आहेत सर्व उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी यांच्या उपस्थितीमध्ये ही गोडाऊन डबल डोअर लॉक पद्धतीने सील करण्यात आली असून यासंदर्भातील लॉग बुक मध्ये संबंधित प्रतिनिधींची स्वाक्षरी नोंदवण्यात आलेली आहे .सदर गोदाम बंद करण्यासाठी प्रक्रिया विहित कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे आणि गोडाऊनचा ताबा सातारा पोलिसांकडे हस्तांतरित करण्यात आलेला आहे.

विटा नगरपरिषदेच्या मतदानाचा वाढता टक्का कोणाच्या पथ्यावर ?

उमेदवारांची धाकधूक वाढली;विटा नगरपालिकेत यांचीच सत्ता येणार समर्थकांत पैजा

विटा/प्रतिनिधीः-
विटा नगर परिषदेच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी मंगळवारी मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली. तीन तारखेला मतमोजणी होती परंतु निवडणूक आयोगाने मतमोजणी पुढे २१ डिसेंबरला घेतल्याने आणि आता विटा नगरपालिकेत सत्ता आमचीच येणार, यावर दोन्ही पक्षाच्या समर्थकांनी पैंजा लावल्या आहेत. त्यामुळे दोन्ही पक्षाकडील समर्थकांचे कार्यकर्त्यांचे व विटेकरांचे २१ तारखेकडे लक्ष वेधून घेतले आहे. या निवडणुकीसाठी मंगळवारी चुरशीने ८० टक्के मतदान झाले. सन २०१६ च्या निवडणुकीपेक्षा

यावेळी सात टक्के मतदान जास्त झाले असून हा वाढलेला टक्का कोणाच्या पथ्यावर पडणार ? याची चर्चा विटा शहरात सुरू झाली आहे.

या वाढलेल्या टक्क्यांमुळे उमेदवारांची धाकधूक वाढले असून २१ डिसेंबरच्या मतमोजणीची उत्सुकता विटेकरांना लागली आहे. विटा नगर परिषदेची निवडणूक यावेळी सत्ताधारी भाजप विरुद्ध शिंदे शिवसेना यांच्यात चुरशीने झाली. भाजपचे नेतृत्व माजी आमदार ड सदाशिवराव पाटील व माजी नगराध्यक्ष ड. वैभव पाटील, अशोकराव गायकवाड यांनी तर शिंदे सेनेचे नेतृत्व आमदार सुहास बाबर व त्यांचे जेष्ठ बंधू अमोल बाबर यांनी केले होते. प्रचाराच्या काळात दोन्ही गटांकडून आरोप - प्रत्यारोपांच्या फैरी झडल्या. या प्रचारात प्रामुख्याने विटा शहराचा पाणी योजना, भुयारी गटार योजना, क्रीडा संकुल, रस्ते, नाट्यगृह, रिंग रोड या सर्व विविध प्रश्न चांगलेच गाजले. त्यामुळे दोन गटांकडून प्रचाराचे हेच मुद्दे असल्याने प्रचारात रंगत आली.

विटा नगर परिषदेच्या निवडणुकीत अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षानेही नगराध्यक्ष पदासह ७ उमेदवार मैदानात उतरवले होते. परंतु खरी लढत भाजपविरुद्ध शिंदे शिवसेना यांच्यात चुरशीने झाली. गेल्या २०१६ च्या निवडणुकीत नगरपालिकेसाठी ७२ टक्के मतदान झाले होते.

सगेसोयऱ्यातील लढत ठरली लक्षवेधी

विटा नगर परिषदेच्या निवडणुकीच्या निमित्ताने प्रभागात अनेक ठिकाणी सगेसोयऱ्यांत झालेली लढत लक्षवेधी ठरली. भाऊ - भाऊ, काका - पुतणे यांच्यात उमेदवारी देऊन घराघरात भांडणे लावण्याचा प्रकार झाल्याचा मुद्दाही प्रचारात गाजला. प्रभाग क्रमांक ९ मध्ये आमदार सुहास बाबर यांचे बंधू अमोल बाबर यांनी निवडणूक लढवली. तर प्रभाग क्रमांक ७ मध्ये माजी नगराध्यक्षा सौ. प्रतिभाताई पाटील यांनी लढत दिली. प्रभाग क्रमांक १३ मध्ये प्रशांत कांबळे विरुद्ध भालचंद्र कांबळे हे दोघे सख्खे भाऊ आमने-सामने आले होते.

स्वायत्त..

लोकशाही महत्वाची
संस्था हव्या स्वायत्त
कारभार चालो मुक्त
निर्णय सर्व अनायत्त
पायमल्ली नकोमुळी
अधिकार होआश्वस्त
ढवळा ढवळ नसावी
नकोकुणा अधिनस्थ
उचित हवा हस्तक्षेप
नको संहिता उध्वस्त
संतुलित हवींयं वृत्ती
जसे तौलनिकत्रयस्थ
हक्कील्ले भक्कम
असावी संरक्षितगस्त
कायद्याची तोड फोड
अलिकडे वाढते प्रस्थ
गरजेनुरूपनियमामधे
वेळोवेळी करी दुरुस्त
हस्तक्षेप वर्जित नीत
कार्य चालावे रे उपात्त
नेमा निस्पृह कर्मचारी
कर्मयोगी ते सावचित्त
नियमात रे प्रतिबंधित
राहो कायम एकश्चित्त
वेळी कडक कारवाई
शैथिल्यातून परावृत्त
जबाबदारीने वागावे
अफवेस नकोनिमित्त

- हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६

दिगंबरा दिगंबरा..च्या गजरात श्री क्षेत्र नृसिंहवाडी दुमदुमली

लाखो भाविकांच्या उपस्थितीत श्री दत्त जन्मकाळ सोहळा उत्साहात

शिरोळ/संदिप आडसुळः-
श्री क्षेत्र नृसिंहवाडी येथे आज दत्तजयंती असलेने नृसिंहवाडी व परिसर अखंड दत्त नामाने दुमदुमून गेला व दिगंबरा दिगंबरा ... च्या अखंड भजनात व श्री गुरुदेव दत्त... च्या गजरात कृष्णा-पंचगंगा संगमतीर्थावर भक्तीमय वातावरणात श्री दत्त महाराजांच्या राजधानीत आज सायंकाळी पाच वाजता श्री दत्त जन्मकाळ सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

आज दत्तजयंती निमित्य श्री दत्त मंदिरात अनेक धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करणेत आले होते.मंदिरात पहाटे ३.३० वाजता काकड आरती व षोडशोपचार पूजा, सकाळी सात ते बारा यावेळेत अनेक भक्तांनी 'श्री ना' पंचामृत अभिषेक पूजा केली.दुपारी साडेबारा वाजता श्रींच्या चरणकमलावर महापूजा करणेत आली. महापूजा झालेवर भाविकांना प्रसाद वाटप करणेत आला. दुपारी तीन वाजता येथील ब्रम्हवृंदा मार्फत पवमान पंचसुक्त पठन करणेत आले.साडेचार वाजता श्रींची उत्सवमूर्ती श्री नारायणस्वामी महाराज यांचे मंदिरातून वाजत गाजत मुख्यमंदिरात आणणेत आली. हरिभक्त पारायण काने बुवा कवठेगुलंद यांचे कीर्तनानंतर ठीक पाच वाजता धार्मिक वातावरणात हजारो भाविकांच्या उपस्थितीत धार्मिक वातारणात मोठ्या उत्साहात विधिवत श्रीदत्त जन्मकाळ सोहळा संपन्न झाला. जन्मकाळ सोहळ्यासाठी चांदीचा पाळणा विविध रंगाच्या फुलांनी आकर्षक सजविला होता.उपस्थित असंख्य भाविकांनी सजविलेल्या पाळण्यावर अबिर, गुलाल व फुलांची मुक्तहस्ताने उधळण केली.

जन्मकाळानंतर येथील दत्त मंदिरात पारंपारिक पाळणागीते व आरत्या म्हणणेत आल्या व प्रार्थना करणेत आली.रात्री दहा नंतर मंदिरात धूप, दीप,आरती व पालखी सोहळा संपन्न झाला दत्तजयंती निमित्य पालखी

व दत्त मंदिर परिसर दत्त देव संस्थान नृसिंहवाडी व पुणे येथील शेखर शिंदे व परिवार तसेच सेवेकरी मंडळी यांनी आकर्षक फुले व पानांनी मंदिर परिसर सजविला होता.उत्सवाचे मानकरी विनोद भानूदास पुजारी यांचे गणेश दत्त कुंज मध्ये भाविकांना दर्शनासाठी जन्मकाळाचा पाळणा ठेवणेत आला

तेथेही भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली. जन्मकाळ सोहळ्यासाठी महाराष्ट्रसह गुजरात, कर्नाटक, गोवा आदी अनेक राज्यातून लाखो भाविक आले होते. कर्नाटक येथील बोरगाव, उगार, चिकोडी तसेच सांगली, मिरज, इचलकरंजी, कोल्हापूर आदी भागातून हजारो भक्त व महिला थंडी असूनही चालत येवून पहाटेच दत्त मंदिरात पोहचले होते.

सायकल व दुचाकी वरून येणाऱ्या भाविकांची संख्या लक्षणीय होती. भाविकांच्या सोयीसाठी येथील दत्त देव संस्थान मार्फत अनेक सोयी व सुविधा पुरविणेत आल्या होत्या मंदिर परिसरात ठीकठिकाणी क्लोज सर्किट टीव्ही.ची व्यवस्था, दर्शन रांगेची उत्तम व्यवस्था,तसेच मुखदर्शन, सकाळी अकरा ते रात्री दहा पर्यंत मोफत महाप्रसाद वाटप, जन्मकाळानंतर सुंठवडा प्रसाद वाटप, सूचना फलक ध्वनिक्षेपक यंत्रणा तसेच नदीचा काठ असलेने तीरावर नौका, पट्टीचे पोहणारे युवक तसेच पाण्यातील इनरट्यूबची व्यवस्था करणेत आली होती. येथील ग्रामपंचायत मार्फत पार्किंग ची सोय, दिवाबत्ती, आरोग्यव्यवस्था, पिण्याचे शुध्द पाण्याची सोय, तसेच फेरीवाले

पान ३ वर

संपादकीय

राष्ट्रीय अध्यक्षाच्या शोधात भाजपा

भारतीय जनता पक्षाच्या नवीन राष्ट्रीय अध्यक्षांची निवड जानेवारी २०२६ पर्यंत होण्याची शक्यता आहे. बिहारमध्ये भाजपला मिळालेल्या ऐतिहासिक विजयानंतर, अध्यक्ष निवडीच्या प्रक्रियेसाठीच्या हालचालींना वेग आला असल्याचे समजते. महाराष्ट्रातील आही ठिकाणी नगरपालिका निवडणुका सुरू आहेत. त्यांचे निकाल २१ डिसेंबर रोजी लागणार आहेत. महाराष्ट्रासह विविध राज्यांमध्ये भाजपच्या संघटनात्मक निवडी झाल्या आहेत. तर उत्तर प्रदेश आणि कर्नाटक भाजपच्या प्रदेशाध्यक्षांची निवड अद्याप झालेली नाही. या दोन्ही राज्यांतील संघटनात्मक निवडी राष्ट्रीय अध्यक्षांच्या अगोदर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे राष्ट्रीय अध्यक्षांच्या निवडीसाठी नवे वर्ष उजडणार असल्याची शक्यता आहे. २०२६ हे वर्ष भाजपला नवा राष्ट्रीय अध्यक्ष मिळवून देणार आहे. नव्या राष्ट्रीय अध्यक्षांची निवड महत्वाची प्रक्रिया आहे. ही निवड उत्तरप्रदेशमधून होईल की महाराष्ट्रातून हे नक्की सांगता येत नाही. परंतु विविध प्रकारचे दावे बड्या नेत्यांकडून होत आहेत आहेत. राष्ट्रीय अध्यक्षासाठी उत्तर प्रदेशचे उपमुख्यमंत्री केशव प्रसाद मौर्य, केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान, भूपेंद्र यादव आणि शिवराज सिंह चौहान यांच्या नावांची चर्चा सध्या अध्यक्षपदासाठी सुरु आहे. यापैकी, रास्वसंघ आणि अमित शाह यांच्या जवळचे मानले जाणारे केशव प्रसाद मौर्य आणि बिहार निवडणूक प्रभारी म्हणून काम केलेले केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचे नाव आघाडीवर आहे.

भाजपचे नेते केशव प्रसाद मौर्य यांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची पार्श्वभूमी आहे. उत्तर प्रदेश आणि इतर निवडणूक रणनीतींना आकार देण्याचा त्यांना सखोल अनुभव आहे. तसेच बिहारमधील विधानसभा निवडणुकीनंतर भाजपने विधिमंडळ पक्षनेते निवड करण्यासाठी त्यांची निरीक्षक म्हणून नियुक्ती केली होती. त्यामुळे त्यांच्या नावाची जोरदार चर्चा सुरु झाली आहे. त्याचप्रमाणे, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी स्वतःला एक अत्यंत प्रभावी भाजप नेते म्हणून स्थापित केले आहे. त्यांनी अलिकडच्या काळात पक्षाच्या अनेक निवडणूक विजयांमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. यामध्ये बिहारचाही समावेश आहे. बिहारच्या निवडणुकीतील त्यांचे नियोजन पक्के होते. त्यामुळे राष्ट्रीय पातळीवर नरेंद्र मोदी असले तरी पक्षीय पातळीवर धर्मेंद्र प्रधानसारखे संयमी नेतृत्व पक्षाला हवे आहे.

भाजपच्या नव्या राष्ट्रीय अध्यक्षाची निवड लवकरच होणार आहे. भाजपमध्ये दर पाच वर्षांनी राष्ट्रीय अध्यक्षांची निवड करण्याची लोकशाही पद्धत आहे, तसे इतर पक्षांमध्ये राष्ट्रीय अध्यक्षपद निवडण्यास विलंब लागतो, असेही दिसून आले आहे. याबरोबरच केंद्रीय मंत्रिमंडळात खांडेपालट होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. बिहार विधानसभा निवडणुकीच्या अगोदर भाजपला नवीन राष्ट्रीय अध्यक्ष मिळणार अशा चर्चांना उधाण आले होते. मात्र बिहार निवडणुकीनंतरच नवा राष्ट्रीय अध्यक्ष निवडणार असल्याचे भाजपा पक्षाने ठरवले. त्याप्रमाणे आता बिहारच्या निवडणुका झाल्या असून भाजपला ऐतिहासिक विजय देखील मिळाला. यामुळे आता भाजपच्या नवीन राष्ट्रीय अध्यक्ष पदासाठी निवड केली जाणार असल्याचा अंदाज आहे. भाजपच्या नव्या राष्ट्रीय अध्यक्षाचे नाव जानेवारी महिन्यात निश्चित केले जाऊ शकते. संसदेचे हिवाळी अधिवेशन १ डिसेंबर रोजी सुरू झाले आहे. दरम्यानच्या काळात भाजप नव्या अध्यक्षाची निवड केली जाईल, असे म्हटले गेले. परंतु भाजपा संयमाने पुढे जात आहे, असे दिसते. पुढील वर्षी पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत. पुढील वर्षी मे पर्यंत निवडणुका सुरू राहिल्यास पक्षाला वेळ मिळणार नाही. त्यामुळे, जानेवारी महिन्यात म्हणजे २०२६ चा सुरूवातीला राष्ट्रीय अध्यक्षाची निवड केली जाईल, असे वाटते. राष्ट्रीय अध्यक्षपद कल्पक, अनुभवी व्यक्तीकडे दिले जाऊ शकते.

केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचे नाव भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्ष पदासाठी अनेक महिन्यांपासून चर्चेत आहे. बिहार निवडणुकीमध्ये ते पक्षाचे प्रभारी होते. त्यांच्या प्रभारी पदाच्या कार्यकाळात बिहारमध्ये पक्षाला अभूतपूर्व यश मिळाले. त्यामुळे धर्मेंद्र प्रधान यांचे नाव राष्ट्रीय अध्यक्ष पदाच्या शर्यतीत पुढे मानले जात आहे. पंतप्रधान मोदी त्यांच्या मंत्रिमंडळात फेरबदल करतील अशी शक्यता आहे. सध्या सरकारमध्ये असलेल्या अनेक नेत्यांना संघटनात्मक जबाबदाऱ्या दिल्या जाऊ शकतात आणि संघटनेत असलेल्यांना मंत्रिमंडळामध्ये आणले जाऊ शकते. मंत्रिमंडळात काही नवीन चेहऱ्यांचा समावेश केला जाणार असल्याचे समजते. भाजप राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या निवडीचा मुद्दा अनेक दिवसांपासून चर्चेत आहे. सत्ताधारी पक्षाच्या नव्या अध्यक्षपदाची माळ कोणाच्या गळ्यात पडणार ? यावर तर्क लावले जात आहेत. मात्र, यासाठी आता लवकरच निवड प्रक्रिया सुरु होण्याचे संकेत आहेत. भाजपच्या घटनेच्या कलम १९ नुसार, पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षाची निवड केली जाते. ही निवडणूक राष्ट्रीय कार्यकारिणीने ठरवून दिलेल्या नियमांनुसार घेतली जाईल, असे पक्षाच्या घटनेत नमूद केले आहे. भाजपच्या घटनेनुसार, किमान ५० टक्के म्हणजे अर्ध्या राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये संघटनात्मक निवडणुका झाल्यानंतरच राष्ट्रीय अध्यक्ष निवडला जातो. त्यानुसार येणाऱ्या काही दिवसांत अर्ध्याहून अधिक राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांमधील प्रदेशाध्यक्षांची निवडप्रक्रिया पूर्ण झालेली असू शकते. परिणामी, भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा होईल, असे वाटते.

महाराष्ट्र भाजपच्या अध्यक्षपदी रविंद्र चव्हाण हे आहेत. हिमाचल प्रदेश भाजपचे डॉ. राजीव बिंदल यांना तिसऱ्यांदा प्रदेशाध्यक्ष म्हणून निवडण्यात आले आहे. तेलंगणामध्ये एन. रामचंद्र राव हे प्रदेशाध्यक्षपदी आहेत. उत्तराखंडमध्ये महेंद्र भट्ट यांच्या गळ्यात पुन्हा भाजप प्रदेशाध्यक्षपदाची माळ पडली. तर, मिझोरममध्ये के. बेचुआ यांची नवीन प्रदेशाध्यक्ष म्हणून निवड झाली.

सदर पाच राज्यांमधील अध्यक्षांच्या निवडीसह, भाजप २३ राज्यांमधील प्रदेशाध्यक्षांची निवडणूक पूर्ण झाली आहे. काही राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये नवीन अध्यक्षांची नियुक्ती होईल. पश्चिम बंगालमध्ये समिक भट्टाचार्य प्रदेशाध्यक्ष आहेत. त्यामुळे देशातील काही थोड्या राज्यांत भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या निवडणूक होईल. त्यानंतर राष्ट्रीय अध्यक्षपदाची निवडणूक होण्याची शक्यता आहे. भाजप राष्ट्रीय अध्यक्षपदासाठी अनेक नावे चर्चेत आहेत. चर्चेतील नावांच्या यादीत शिवराज सिंह चौहान, मनोहरलाल खट्टर, धर्मेंद्र प्रधान, भूपेंद्र यादव या केंद्रीय मंत्र्यांचा समावेश आहे. मनोज सिन्हा, बी. एल. संतोष यांच्याही नावाची अधून मधून चर्चा झाली आहे. या व्यतिरिक्त महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याही नावाची चर्चा झाली. मात्र, भाजप अध्यक्षपदाची माळ कोणाच्या गळ्यात पडेल यावर शिक्कामोर्तब होणे बाकी आहे. चर्चेत नसलेल्या नेत्याकडेही पक्षाचे सूत्र जाऊ शकतात, असेही मानले जात आहे.

उशिरा निकालांचा अन्वयार्थ

माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी निवडणूक आयोगावर टीका केली आहे की, आयोगाने अक्षम्यतेने काम केले आहे. मतदान झालेल्या नगरपालिकांचा निकाल आता २१ डिसेंबरला लागणार आहे. म्हणजे जवळजवळ १५ दिवस मतदान मशिन या कुठेतरी गोडावूनमध्ये ठेवल्या जातील. त्यामुळे त्या मशिनमध्ये काही गडबड करायचे असेल तर सरकारला भरपूर वेळ मिळेल, असा पृथ्वीराज बाबांनी आरोप केला आहे. काँग्रेसचे राष्ट्रीय नेते असलेलेले पृथ्वीराज चव्हाण अभ्यासू नेते म्हणून ओळखले जातात. त्यांनी म्हटले आहे की, निवडणूक आयोग किती अक्षम्यतेने काम करतोय हे आपल्यासमोर आले आहे. कराड येथे ते पत्रकार परिषदेत बोलत होते. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आ. शशिकांत शिंदे यांनीही निवडणूक आयोगाला जबाबदार धरले आहे. त्यांनी म्हटले आहे की, निवडणूक प्रक्रियेवर सामान्य जनतेचाही आता विश्वास राहिलेला नाही. निवडणुकीत घोळ करण्यासाठीच मतमोजणी लांबणीवर टाकण्यात आली आहे. अशी चर्चा सामान्य जनतेमध्ये जाहीरपणे सुरू आहे. एकूणच विरोधकांत अशी चर्चा सुरू झाली आहे की, नगरपालिका निवडणुकांचा निकाल लगेच दुसर्या दिवशी लागणे आवश्यक होते, परंतु मतमोजणी मशीन्स गोडावूनमध्ये १५ दिवस पडून राहणार असल्यामुळे मतांमध्ये हेराफेरी होण्याची शक्यता आहे.

अशोक सुतार

कृष्णाकाठ...

माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज बाबा चव्हाण यांनी म्हटले आहे की, या सर्व प्रकारामुळे निवडणूक प्रक्रियेवरचा लोकांचा विश्वास उडत चालला आहे. सरकार आणि निवडणूक आयोग एकमेकांवर जबाबदारी ढकलून बाजूला होत आहे. न्यायालयात केस सुरू होती, त्यावेळेस सरकारच्या वकिलांनी प्रभावीपणे बाजू मांडायला हवी होती. तसे झाले असते तर निकाल पुढे गेले नसते. परंतु, ती बाजू मांडण्यामध्ये सरकारला अपयश आले आहे. आता त्याबाबत निवडणूक आयोगाला दोष देऊन काही उपयोग नाही. कारण हा निकाल न्यायालयाने दिला आहे.

निकाल पुढे ढकलण्याबाबतचे प्रकरण न्यायालयात गेले त्यावेळी सरकारी वकील झोपले होते का ? असा संतप्त सवाल करत पृथ्वीराज चव्हाण यांनी केला आहे. त्यांनी म्हटले आहे की, सरकारी वकिलांनी आम्हाला हे नको आहे, ताबडतोब निकाल द्या, असे म्हणून सरकारची बाजू मांडायला हवी होती. त्यामध्ये त्यांना अपयश आले आहे. आता त्याचे खापर ते निवडणूक आयोगावर फोडत आहेत, हे योग्य नाही. जोपर्यंत जनता जागृत होत नाही, तोपर्यंत हळूहळू हे असेच होत राहणार आणि या देशात लोकशाही नाही तर संपूर्णपणे हुकूमशाही आलेली दिसेल, असेही त्यांनी सांगितले. पृथ्वीराज चव्हाण यांचे म्हणणे असे आहे की, जनतेने आता सावध राहिले पाहिजे, अन्यथा एकाधिकारशाही वाढू शकते.

राष्ट्रवादी भवन येथे प्रसारमाध्यमांशी बोलताना राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आ. शशिकांत शिंदे यांनीही अशाच प्रकारचा आरोप करत म्हटले आहे की, निवडणूक आयोगाने अत्यंत घाईगडबडीने निवडणुकीचा कार्यक्रम लावला. एखादी त्रुटी राहिली तरी लोक न्यायालयात जाणार, याचे सुतोवाच मी यापूर्वीच केले होते, तसेच झाले आहे. राज्याचे मुख्यमंत्री तसेच सरकारमधील लोकांना हे माहीत नव्हते का ? राज्यात सरकारची तीन माकडासारखी परिस्थिती आहे. निवडणूक आयोगाने न्यायालयाकडे मुदत वाढवून घेण्याची मागणी केली नाही. तसेच घाईगडबडीत कार्यक्रम जाहीर करून विरोधकांना निवडणुकीत कशा पद्धतीने रोखता येईल, हेच पाहिले गेले आहे.

आता न्यायालयाच्या आदेशानुसार निवडणूक लांबणीवर गेली आहे. सत्तेत असलेले लोक काहीही करु शकतात, अशीच महाराष्ट्रातील सामान्य जनतेची भावना आहे. ईव्हीएम मशीनमध्ये घोटाळा करण्यासाठीच निवडणूक पुढे ढकलली गेली आहे, अशी जाहीर चर्चा सर्वसामान्यांमध्ये सुरू आहे, असा आरोप आ. शशिकांत शिंदे यांनी केला आहे. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष व काँग्रेसने मतांची हेराफेरी होऊ शकते असा आरोप केल्यानंतर निवडणूक आयोगाने चुप्पी साधली आहे. असे असताना, सातारा नगरपालिकेच्या निवडणुकीतील मतदानाचा टक्का ९. २८ ने घसरला आहे. सातारा हद्दवाढीनंतर ५४ हजार ८७४ मतदार वाढले, तर ३५ मतदान केंद्रांचीही भर पडली. असे असूनही नऊ वर्षांपूर्वी झालेल्या नगरपालिका निवडणुकीतील मतदानाच्या तुलनेत यावेळी मोठी घट झाली आहे. मतदानाकडे तब्बल ६१ हजार ४९५ मतदारांनी पाठ फिरवली आहे. त्याची टक्केवारी ४१. ४६ इतकी असून हे मतदार गेले तरी कुठे? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

तसेच नगरपालिका निवडणुकी दरम्यान सातारा पालिकेच्या सर्वात्रिक निवडणुकीवेळी अनेक ठिकाणी हाणामार्या, तणातणी, बाचाबाचीचे प्रकार घडले. त्यामुळे तणाव निर्माण झाला होता. मतदारांना मतदानासाठी घराबाहेर काढण्यासाठी उमेदवारांनी बऱ्याच क्लृप्त्या केल्या होत्या. मात्र झोपडपट्टी व हद्दवाढ भागातून नव्याने समाविष्ट झालेला मतदार मतदान प्रक्रियेकडे फिरकलाच नसल्याचे स्पष्ट होते. प्रत्यक्ष मतदानादिवशी मतदानासाठी म्हणावा तसा प्रतिसाद मिळाला नसल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट झाले. या मतदान प्रक्रियेकडे तब्बल ६१ हजार ४९५ मतदारांनी अक्षरशः पाठ फिरवली. मतदान न करणाऱ्यांची टक्केवारी ४१.४६ इतकी आहे. यावेळी पालिका निवडणुकीत झालेल्या एकूण मतदानाची टक्केवारी लक्षात घेता यावेळी मतदारांचा सहभाग कमी असल्याचे स्पष्ट होते. म्हणजे, नगरपालिका निवडणुकीत मतदार फारसे उत्सुक नव्हते, असा अर्थ ध्वनित होतो. तसेच निवडणुकीच्या निकालाला विलंब लावून निवडणूक आयोग आणि राज्य सरकारला नेमके काय साधायचे आहे ? असा प्रश्न निर्माण न झाल्यास नवलच.

डॉ.रमेश प्रभू यांचे नाव विलेपार्ले मेट्रो स्टेशनला देण्यासाठी निश्चित प्रयत्न करेन

मंत्री अँड.आशिष शेलार

मुंबई/प्रतिनिधी:-

शैक्षणिक, क्रीडा, आरोग्य, राजकीय क्षेत्रात स्वतःला झोकून समरसतेची वृत्ती जोपासणारे माजी आमदार-माजी महापौर डॉ.रमेश प्रभू यांनी शिवसेनेसाठी आपले जीवन समर्पित केले आणि विलेपार्ले ला समृध्द करण्याचे मोलाचे काम त्यांनी केले.

१९८७च्या विलेपार्लेच्या पोटनिवडणुकीत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी खारदांड्याच्या शंकर मंदिरात झालेल्या प्रचारसभेत हिंदुत्वावर मते मागितली, त्यामुळे १९९५ साली निकाल देत या दोघांचा सहा वर्षे निवडणूक लढवण्याचा आणि मतदान करण्याचा हक्क सर्वोच्च न्यायालयाने काढून घेतला. त्यानंतर डॉ. प्रभू यांचे नाव हिंदुत्वाशी जोडले गेले आणि देशात ही निवडणूक चर्चेत आली. मात्र नंतर त्यांची शिवसेनेने अवहेलना केली अशी खंत राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री अँड. आशिष शेलार यांनी काल रात्री पार्ल्यात व्यक्त केली.

तर डॉ. प्रभू यांची कन्या लीना प्रभू यांच्या सूचनेवरून आजच्या पिढीला त्यांचे कार्य समजावे म्हणून प्रभू महिमा हे पुस्तक राज्यातील प्रत्येक लायब्ररीत ठेवण्यासाठी आणि त्यांचे नाव विलेपार्ले येथील मेट्रो स्टेशनला देण्याचा पार्लेकरांच्या वतीने आग्रह केला.

मी निश्चित प्रयत्न करेन असे आश्वासन मंत्रीमहोदयांनी दिले. आपला ठसा उमटवण्या डॉ. रमेश प्रभू यांच्या जीवनाची झलक दाखविणारे नाट्यरूप सादरीकरण होणारे ते पहिलेच, माजी महापौर असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले.

छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती, जुहू-विलेपार्ले (मुंबई) चे संस्थापक अध्यक्ष स्व.डॉ. रमेश प्रभू आणि त्यांची पत्नी, प्रख्यात वैद्यकीय चिकित्सक स्व. डॉ. पुष्पा प्रभू यांच्या जीवनप्रवासावर आधारित प्रभू महिमा या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा काल रात्री विलेपार्लेच्या दीनानाथ मंगेशकर नाट्यगृहात आयोजित केला होता, त्यावेळी मंत्री शेलार मुख्य अतिथी म्हणून बोलत होते. त्याआधी डॉ. रमेश प्रभू आणि डॉ. पुष्पा प्रभू यांच्या कार्याचा आणि प्रेरणादायी जीवनाची झलक दाखविणारे, लीना प्रभू संकल्पित नाट्यरूप सादरीकरण देखील यावेळी सादर केले होते.

यावेळी विशेष अतिथी म्हणून विलेपार्ल्याचे आ. अँड.पराग अळवणी, तसेच प्रमुख अतिथी म्हणून माजी खासदार-माजी मंत्री गजानन कीर्तिकर, माजी महापौर अँड. निर्मला सामंत प्रभावळकर, प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलाचे विश्वस्त राजू रावळ, डॉ.प्रभू यांचे पूत्र अरविंद प्रभू, कन्या लीना प्रभू आणि सुमारे साडेतीन तास मोठ्या संख्येने पार्लेकर उपस्थित होते.

आ.अँड.पराग अळवणी म्हणाले की, डॉक्टर यांचे जीवनपट आणि कार्य म्हणजे आमच्या साठी एक सिलॅबस आहे.या पुस्तकाने त्यांचे उत्तुंग व्यक्तिमत्व नवीन पिढीला समजेल. शिवसेना भाजपयुतीसाठी डॉ.रमेश प्रभू यांनी शिवसेनाप्रमुख आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक बाळासाहेब देवरस यांची पार्ल्यात रमेश मेहता यांच्या घरी शिवसेनाप्रमुख घेवून जात त्यांची भेट घडवून आणली हा किस्सा त्यांनी सांगितला. १९८७ साली हिंदुत्वावर ते निवडणूक लढले. त्यांची निवडणूक न्यायालयाने रद्द केली,मात्र हिंदुत्व ही एक जीवनशैली असे कोर्टाने सांगितले.

गजानन कीर्तिकर यांनी डॉ.रमेश प्रभू यांच्या अनेक आठवणी जागवल्या.

अँड.निर्मला सामंत - प्रभावळकर म्हणाल्या की, डॉक्टर हे राजकारणातील वेगळे राजकारणी होते. त्यांचा क्रीडा, पर्यावरण, सांस्कृतिक क्षेत्रातील त्यांचे कार्य आणि त्यांचा न्यायालयीन खटला वकील म्हणून जवळून बघितला.

राजू रावळ यांनी बाळासाहेब ठाकरे आणि बाळासाहेब देवरस यांची डॉ.प्रभू यांनी घडवलेल्या भेटीचा आपण साक्षीदार होतो.

आपल्या प्रास्ताविकात लीना प्रभू म्हणाल्या की, आई आणि बाबा यांच्या कार्याचा आणि प्रेरणादायी जीवनाची झलक दाखविणारे नाट्यरूप सादरीकरणाची संकल्पना माझ्या मनात घर करून बसलेली. या पुस्तकातून अनेक मान्यवरांनी डॉ. प्रभूंचा जीवनपट उलगडला आहे. त्यांचे कार्य आजच्या पिढीला समजावे म्हणून या पुस्तकाची मराठी आणि इंग्रजी भाषेत मी आणि भाऊ अरविंदने निर्मिती केली.त्यांचे कार्य दिपस्तंभा सारखे होते. त्यामुळे त्यांच्या नावाने विलेपार्ले च्या मेट्रो स्टेशनला मंत्री अँड.आशिष शेलार आणि आ. अँड.पराग अळवणी यांनी सहकार्य करावे असा त्यांनी आग्रह केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते महेश तपासे यांनी हिंदुत्वासाठी राजकीय हुतात्म्या स्वीकारलेले स्व. डॉ. रमेश प्रभू यांच्या प्रभू महिमा पुस्तकाचे प्रकाशन होत आहे याचा खूप आनंद व्यक्त केला आणि त्यांची आत्ये बहीण, लीना र प्रभू यांच्या मागण्या, स्व. डॉ. रमेश प्रभूंच्या नावाचं स्थान, मेट्रो स्टेशन/ हॉस्पिटल/ शाळा, कॉलेज प्रशासनाला द्यायला पाहिजे, आणि हे पुस्तक राष्ट्राच्या प्रत्येक संग्रहालय मध्ये पोस्ट करायला पाहिजे, यांना पाठिंबा दिला. पाठिंबा दिला.

श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात दत्त जयंती उत्सव भक्तिभावाने संपन्न

अक्कलकोट/महेश गायकवाड:-

श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात दत्त जयंती उत्सव श्रद्धेय भक्तिभावाने संपन्न. झाला. पुरोहित व भाविकांकडून दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबराच्या नामजपाने आसमंत दुमदूमला. यावेळी प्रथमेश इंगळे यांच्या हस्ते आरती करण्यात आली.

श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरातील पुरोहित मंदार महाराज पुजारी प्रथमेश इंगळे व विश्वस्ता उज्वलाताई सरदेशमुख व सत्संग महिला भजनी मंडळातील भजन करी व उपस्थित स्वामी भक्तांच्या मुखातूनदिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबराच्या नामजपाने अवघा आसमंत दुमदूमला. निमित्त होते श्री दत्त जयंती उत्सवाचे.

अक्कलकोट निवासी दत्तावतारी श्री स्वामी समर्थ महाराजांचे मूळस्थान असलेल्या श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात आज गुरुवारी श्री दत्त जयंती उत्सव अपार श्रद्धेने व मोठ्या भक्तिभावाने संपन्न झाला.

दत्त जयंती उत्सवाच्या निमित्ताने अक्कलकोट शहरात व श्री वटवृक्ष मंदिरात आज सर्वत्र उत्साहपुर्ण भक्तीमय वातावरण दिसले. पहाटे ४ वाजता मंगलमय वातावरणात देवस्थानचे पुरोहित मोहनराव (गुरुजी) पुजारी यांच्या अधिपत्त्याखाली, मंदिर समितीचे चेअरमन व मा.नगराध्यक्ष तथा नगरसेवक महेश इंगळे यांच्या उपस्थितीत श्रींची काकडआरती संपन्न झाली. त्यानंतर स्वामी भक्तांना दर्शनाकरिता मंदिर खुले करण्यात आले. भक्तांच्या वाढत्या गर्दीमुळे स्वामी भक्तांचे नित्यनियमाने होणारे अभिषेक आज बंद ठेवण्यात आले होते. सकाळी साडे अकरा वाजता श्रींचा नैवेद्य आरती सोहळा मोठ्या भक्तीमय वातावरणात पार पडला. दत्त जयंती निमित्त राज्याच्या कानाकोपऱ्यातून दिंडी व पालखी सोबत पायी चालत निघालेल्या स्वामी भक्तांची स्वारी या काळात अक्कलकोटी विसावली. यामध्ये पुणे, रत्नागिरी, सातारा, कोल्हापूर, घाटकोपर, भांडुप-मुंबई, बार्शी, भातम्बरे, इत्यादी परगावाहून येणाऱ्या पालखी व दिंडीचा सहभाग होता. या दिंडी व पालखी सोबत आलेल्या सर्व स्वामी भक्तांची भोजन प्रसादाची व निवासाची सोय देवस्थानच्या भक्त निवास येथे करण्यात आली होती. पहाटे ५ वाजल्यापासून ते रात्री १० पर्यंत दिवसभरात हजारो स्वामीभक्तांनी दत्तावतारी स्वामी समर्थांचे दर्शन घेऊन तृप्त झाल्याची भावना व्यक्त केली. सर्व स्वामी भक्तांचे दर्शन सुलभतेने होणेकरिता मंदिर समितीच्या वतीने सर्व स्वामी भक्तांना रांगेत व प्रसंगी टप्प्या टप्प्याने दर्शनास सोडण्यात आले.

भक्तांचे दर्शन सुलभतेने होणेकरिता मंदिर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली मंदिराचे कर्मचारी, सेवेकरी यांनी परिश्रम घेतले. तसेच मंदीरात कोणतेही अनुचित प्रकार घडू नये व स्वामी भक्तांच्या सुरक्षिततेकरिता पोलीस बंदोबस्तही नियुक्त करण्यात आले होते. दुपारी ४ ते ५:३० या वेळेत देवस्थानच्या विश्वस्ता उज्वलाताई सरदेशमुख यांच्या अधिपत्याखाली सत्संग महिला भजनी मंडळाच्या वतीने दत्त जन्म आख्यान, वाचन, व दत्तसंप्रदायिक भजन होऊन सायंकाळी ६ वाजता पुरोहित मोहनराव पुजारी व मंदार महाराज, मोहित महाराज यांच्या हस्ते पाळणा पूजन व प्रथमेश इंगळे यांच्या हस्ते आरती होऊन असंख्य स्वामी भक्तांच्या उपस्थितीत दत्त जन्म सोहळा देवस्थानच्या ज्योतिबा मंडपात संपन्न झाला. या सोहळ्याप्रसंगी समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, संपतराव शिंदे, उज्वलाताई सरदेशमुख, कौशल्या जाजू,

दत्त जन्म सोहळ्याप्रसंगी पाळणा पूजन व आरती करताना प्रथमेश इंगळे व इतर दिसत आहेत.

शकुंतला कटारे, सुरेखा तेली, सुवर्णा जाधव, गिरीश पवार, ऋषिकेश लोणारी, मोहन जाधव, जयप्रकाश तोळणूरे, सागर गोंडाळ, महेश मस्कले, अमर पाटील, बाळासाहेब घाटगे, अक्षय सरदेशमुख, प्रदीप हिंडोळे, महादेव तेली, स्वामीनाथ लोणारी, सचिन हन्नूरे, सागर दळवी, लखन सुरवसे, रमेश होमकर, सचिन पेटकर, ओंकार महाडीक, सागर गोंडाळ, श्रीपाद सरदेशमुख, सिद्धाराम कुंभार, महेश मस्कले, बंडोपंत घाटगे,श्रीशैल गवंडी, चंद्रकांत गवंडी, दर्शन घाटगे, समर्थ स्वामी, ज्ञानेश्वर भोसले, आकाश चुंगीकर, तुषार मोरे, आदीत्य गवंडी, आकाश शिंदे आदीसह भाविकभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात श्री दत्त जयंती सोहळा,आणि गुलाल व पाळणा उत्साहात संपन्न

अक्कलकोट/प्रतिनिधी:-

अवधूत चिंतन श्री गुरुदेवदत्त, सद्गुरू श्री स्वामी समर्थ महाराज की जय...! च्या जयघोषात श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात श्री दत्त जयंती सोहळा, गुलाल व पाळणा गुरुवारी सायंकाळी न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ आणि हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने शेकडो भाविकांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

दरम्यान न्यासाच्या परिसरात असलेल्या श्री दत्त मंदिरात मुख्य पुरोहित अप्पू पुजारी, विश्वंभर पुजारी यांच्या हस्ते विविध धार्मिक विधी नंतर श्रींच्या जयंतीनिमित्त गुलाल व पाळणा कार्यक्रम हिरकणी संस्थेच्या संस्थापिका अध्यक्षा सौ.अलकाताई जनमेजयराजे भोसले, सौ.अर्पिताराजे अमोलराजे भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत व हजारो स्वामी भक्तांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात संपन्न झाला. श्री दत्त मंदिर व चांदीच्या पाळण्याला विविध फुलांनी सुशोभित करण्यात आले होते. गुलाल व पाळणा कार्यक्रमाच्या अगोदर श्री गुरुमाई भजनी मंडळ सोलापूर, रामकृष्ण हरी भजनी मंडळ, श्री स्वामी समर्थ महिला भजनी मंडळ अक्कलकोट या विविध भजनी मंडळाच्या वतीने भजनाचा कार्यक्रम संपन्न झाला. या सह नामस्मरण, संकल्प, नैवद्य व आरती अमोलराजे जनमेजयराजे भोसले व सौ.अर्पिताराजे अमोलराजे भोसले यांच्या हस्ते करण्यात आले. उपस्थित भक्तांना सुंठवडा, प्रसाद व मसाला दुध वाटप करण्यात आले.

याप्रसंगी हिरकणी संस्थेच्या माजी नगराध्यक्षा अनिता खोबरे, कु. तेजस्विनीराजे अमोलराजे भोसले, कु.हर्षवर्धनराजे अमोलराजे भोसले, कु.स्वामिनिराजे अमोलराजे भोसले, संगीता भोसले, पल्लवी कदम, स्मिता कदम, कविता वाकडे, सुवर्णा घाडगे, रूपा पवार, श्रुती मोरे, धनश्री पाटील, स्वाती निकम, तृप्ती बाबर, डॉ. कीर्ती कटारे, अनिता गडदे, कल्पना मोरे, स्वप्ना माने, गुरुदेवी माणकोजी, सोनाली लोनी, निशा जगताप, मंजुश्री आळ्ळे, जयश्री सुरवसे, छाया पवार व घाटकोपर पूर्व येथील धैर्यशील शितोळे बाबा उमेश काळभोर, तुकाराम सरफदार, डॉ. प्रसाद प्रधान, मंडळाचे सचिव शामराव मोरे, मनोज निकम, सौरभ मोरे, निखिल पाटील, अप्पा हंचाटे, प्रीतीश किलजे, दत्ता माने, प्रवीण घाडगे, विजय माने, बसवराज क्यार, बालाजी कटारे, प्रा.चंद्रकांत पाटील, पप्पू कोल्हे, विनायक भोसले, सतीश महिंद्रकर, सागर पवार, विराज माणिकशेट्टी, अश्पाक काझी, पिंटू साठे, राजू पवार, तानाजी पाटील, रमेश हेगडे, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, अनिल बिराजदार, लक्ष्मण बिराजदार, रमेश हळसंगी, असद फुलारी, शिवराम काजळे, राहुल इंडे, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, विठ्ठल रेड्डी यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

प्रिन्स वेल्फेअर ट्रस्टच्या वतीने इज्तेमाई शादीया

११ जोडप्याचा सामुदायिक विवाह सोहळा उत्साहात संपन्न

अक्कलकोट/प्रतिनिधी:-

प्रिन्स वेल्फेअर ट्रस्ट अक्कल बी बी एच डी एचकोट यांच्यावतीने इज्तेमाई शादीया मुस्लिम सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते यंदाचे हे २रे वर्ष असुन इज्तेमाई शादीया सामुदायिक विवाह सोहळा यावर्षी मोठ्या दिमाखात आणि उत्साहात संपन्न झाला आहे.

दि ३ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ठीक ६:३० वाजता हा विवाह सोहळा टिनवाला फंक्शन हॉल येथे आयोजित करण्यात आला होता, या इज्तेमाई शादियां सामुदायिक विवाह सोहळ्यामध्ये ११ वधू-वरांचा लग्न लावण्यात आले या विवाह सोहळ्यास अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत सामुदायिक विवाह सोहळा संपन्न झाला.

प्रिन्स वेल्फेअर ट्रस्ट अक्कलकोट इज्तेमाई शादियां सामुदायिक विवाह सोहळ्यास आलेलेल्या नातेवाईकांना आणि सर्व नागरिका साठी विवाह सोहळा संपन्न झाल्यावर टिनवाला फंक्शन हॉल येथे जेवणाची व पाण्याची व्यवस्था उत्तम प्रकारे करण्यात आली होती.

या सामुदायिक विवाह सोहळा विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थितीत हा विवाह सोहळा संपन्न झाला.

या सोहळ्यात ११ जोडप्यांना निकाह करणाऱ्या नवदाम्पत्यांना प्रिन्स वेल्फेअर ट्रस्ट अक्कलकोट आयोजकांच्या वतीने कपाट, गादी, पलंग तसेच संसार उपयोगी साहित्य, वर-वधू यांना कपडे, वधूसाठी मणी मंगळसूत्र व आलेल्या पाहुण्यांना जेवणाची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती.

इज्तेमाई शादीया सामुदायिक विवाह सोहळा हाफिज व कारी सय्यद अब्दुल रऊफ पीरजादे कादरी साहेब यांच्या अध्यक्षते खाली संपन्न झाला.

या सामुदायिक विवाह सोहळ्यात प्रमुख उपस्थिती, प्रमुख मान्यवर मुफ्ती अमजद अली काजी सोलापूर,शब्बीर मौलाना (सोलापूर), अन्वर पाशा पिरजादे, अशपाक भाई बाळोरगी, सद्दाम शेरीकर, मल्लिकार्जुन पाटील, इरफान दावना, हाजी अजीज शेख सर, एजाज बाळोरगी, शकूर शेख, दाता बाळोरगी, मूर्तूज बाजे, मौला पठाण, शाकीर पटेल, युसुफ बागलकोटे, अखिल मुजावर, सोहेल फरास, मुस्तफा बाळोरगी, रशीद खिस्तके, खाजा हुसेन हाफिज मैंद्रगी, अनिस हाफिज, इब्राहिम मौलाना, सरफराज मौलाना, हाफीज इस्तियाक, हाफीज अक्रम, मौलाना इर्शाद रजा, आसिफ जमादार आदीसह उपस्थित होते.

इज्तेमाई शादीया सामुदायिक विवाह सोहळ्यास आवर्जून राहिल्याबद्दल प्रिन्स वेल्फेअर ट्रस्ट चे हाफिज व कारी सय्यद अब्दुल रऊफ पीरजादे कादरी साहेब यांनी सर्वांचे आभार मानले अशी माहिती सामाजिक कार्यकर्ते सोहेल फरास यांनी दिली.

संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हाजी अजीज शेख सर यांनी केले.

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक श्री.शशिकांत आकाराम पाटील यांनी प्रीतिसंगम प्रिंटर्स, कोयना औद्योगिक वसाहत, मलकापूर-कराड येथे छापून गोदावरी प्लाझा, हेड पोस्टाजवळ, शनिवार पेठ कराड, येथे प्रसिद्ध केले आहे. या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. R.N.I.No.MAHMAR./२००१/१०३३८ रजिस्टर No.MAHMAR/14511/13/1/96/Te पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 *मुख्य कार्यालय:- गोदावरी प्लाझा, हेड पोस्ट जवळ, शनिवार पेठ कराड, जि.सातारा, पिनकोड - ४१५११० फोन (०२१६४)२२७७२५,,फॅक्स २२६९२५, * सातारा कार्यालय:- संजीवन सीटी स्कॅन शेजारी, सिव्हील हॉस्पिटल रोड, सातारा फोन नं:-९२२६३९८८१७ RNI.mar/२००१/१०३३८.
email-pritisangamkarad@gmail.com

वहागांव ठरले विकासाचे आदर्श मॉडेल ; १० लाख ६० हजाराचा पुरस्कार प्राप्त

स्व.आर.आर.पाटील स्मार्ट ग्रामपंचायत स्पर्धेत तालुक्यात प्रथम आणि संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानात ठरले अव्वल

कराड/प्रतिनिधी:–

कराड तालुक्यातील आदर्श गाव वहागावने स्व. आर.आर. पाटील स्मार्ट ग्रामपंचायत स्पर्धेत तालुक्यात प्रथम क्रमांक आणि संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानात प्रथम स्थान पटकावले आहे. ग्रामपंचायतीच्या नावावर एकूण दहा लाख साठ हजारांची अनुदान रक्कम खात्यावर जमा झाली आहे. ग्रामीण महाराष्ट्रात विकासाचे अनेक आदर्श गावे दिसतात; परंतु काही गावे अशी असतात, की ती केवळ योजना पूर्ण करून थांबत नाहीत, तर स्वतःचा मार्ग स्वतः तयार करतात. आर्थिक रकमेपेक्षा महत्त्वाचे आहे ते, या गावाने साधलेले व्यवस्थापन, शिस्त आणि सामुदायिक जबाबदारीचे भक्कम दर्शन. गावाने कमावलेला आत्मविश्वास महत्वाचा आहे, असे प्रतिपादन वहागावचे सरपंच संग्राम बाबा पवार यांनी केले आहे.

वहागावचे सरपंच पवार यांनी गावाच्या यशाबद्दल म्हटले आहे की, गावाचा हा प्रवास केवळ पुरस्काराच्या पायऱ्या चढण्यापुरता मर्यादित नाही. हे यश त्याहूनही व्यापक आहे ; कारण त्यामागे एक सजग आणि सक्षम ग्रामव्यवस्था उभी आहे. गावाचे आदर्श सरपंच संग्राम बाबा पवार, विद्यमान सरपंच, उपसरपंच, सर्व सदस्य आणि ग्रामपंचायत अधिकारी यांनी दाखवलेली शिस्तबद्ध कारभारशैली, आणि त्याहून महत्त्वाचे म्हणजे ग्रामस्थांचा सक्रिय, निःस्वार्थ आणि सातत्यपूर्ण लोकसहभाग–या चारही घटकांनी एकत्रितपणे गावात परिवर्तनाची पायाभरणी केली. यामुळेच

हे शक्य झाले.

आजकाल प्रशासन आणि गावकऱ्यांच्या संवादात दरी निर्माण होते, परंतु वहागांवने या दरीवर पूल बांधला. गावात राबवलेल्या उपक्रमांची रचना ही केवळ आदेश किंवा नुसत्या सूचना याद्वारे नव्हती; ती होती ग्रामसभेतील चर्चांमधून, नागरिकांच्या सक्रिय सहभागातून आणि सातत्याने केलेल्या अभ्यासपूर्ण कामातून तयार झालेली, असे कौतुकोद्गार यशदाचे मास्टर ट्रेनर विद्याधर गायकवाड यांनी काढले आहेत.

स्वच्छता अभियानात कचरा व्यवस्थापन, रस्त्यांची निगा, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता किंवा डिजिटल सेवांची अंमलबजावणी–हे सर्व कामे एकत्र नांदली; कारण गावात गाव माझा–जबाबदारी माझी ही भावना रुजली. बक्षिसाच्या रूपात गावाला मिळालेल्या निधीचा पुढील नियोजनबद्ध, पारदर्शक आणि सर्वसमावेशक वापर हे गावासमोरील पुढील आव्हान असणार आहे. आणि आतापर्यंत दाखवलेल्या कामगिरीवरून हे आव्हान वहागांव समर्थपणे पेलणार यात शंका नाही.

ग्रामस्थांचा लोकसहभाग व अधिकाऱ्यांच्या तत्परतेमुळेच यश

आदर्श सरपंच संग्राम बाबा पवार यांचे नेतृत्व, ग्रामपंचायतचे ध्येयवादी आचरण, सदस्यांची बांधिलकी, अधिकाऱ्यांची तत्परता आणि ग्रामस्थांचा लोकसहभाग यात ही सर्वच मंडळी यशाची मुख्य भागीदार आहेत. हे कौतुक व्यक्तींचे नसून संपूर्ण गावाच्या विकासमनस्कतेचे आहे. वहागांवचे हे यश ग्रामीण महाराष्ट्रासाठी प्रेरणादायी आहे. कारण येथे विकास हा आदेशाने नव्हे, तर जाणीव, अभ्यास, आणि एकात्मतेने साधला गेला आहे. अशाच मूल्यांवर आधारित गावांची शृंखला निर्माण झाली, तर महाराष्ट्रातील ग्रामीण प्रगती अधिक समतोल, सुदृढ आणि सर्वसमावेशक होईल, अशी अपेक्षाही

– विद्याधर गायकवाड
मास्टर ट्रेनर, यशदा, पुणे

दिपाली पाटील(निकम)यांची क्रीडा प्रबोधिनी पुणेच्या प्राचार्य पदावर नियुक्ती

कडेगांव/प्रतिनिधी : –

कडेगाव तालुक्यातील चिंचणी (अं.) येथील श्री शिवाजी हायस्कूलची माजी विद्यार्थींनी दिपाली बबनराव पाटील (निकम) यांची क्रीडा प्रबोधिनी पुणे च्या प्राचार्य पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. दिपाली पाटील या सायकलिंगमधील पहिले राष्ट्रीय पदक विजेती महिला खेळाडू, जिजामाता पुरस्कार विजेती, अनेक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पदक विजेते खेळाडू तयार केलेल्या क्रीडा मार्गदर्शक आहेत.

ग्रामीण भागातील विद्यार्थींने पुणे शहरात जाऊन दिपाली निकम यांनी, स्वतःसह, गुरुंचे, शाळेचे आणि गावचे नाव उज्ज्वल केल्याने सोनहिरा नगरीत त्यांचे व कुटुंबीयांचे कौतुक होत आहे.

चिंचणी गावचे नव उद्योजक देवाई उद्योग समूहाचे संस्थापक, तसेच कडेगांव भारतीय जनता पार्टीचे उपाध्यक्ष सचिन माने, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज युवा, सांस्कृतिक क्रीडा मंडळ चिंचणी (अं.) ग्रामस्थांकडून त्यांच्या कार्याबद्दल पुढील वाटचालीस शुभेच्छा देऊन अभिनंदन केले.

ग्रीन पॉवर शुगर्स साखर कारखान्याकडून प्रतिटन ३३०० ऊस बिल जमा:संग्राम देशमुख

कडेगाव/प्रतिनिधी:–

ग्रीन पॉवर शुगर्स गोपूज साखर कारखान्याने चालू गळीत हंगाम २०२५/२६ च्या पहिल्या पंधरवड्यात गाळपासाठी आलेल्या ऊसाला प्रतिटन ३३०० रुपयांप्रमाणे ऊसबिलाची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा केल्याची माहिती कारखान्याचे मुख्य प्रवर्तक सांगली जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संग्रामसिंह देशमुख यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

पत्रकात म्हटले आहे की, चालू गळीत हंगामच्या पहिल्या पंधरवड्यात गळपासाठी आलेल्या ऊसाचे प्रति मेट्रिक टन ३३०० रुपयांप्रमाणे बिलाची रक्कम थेट ऊस उत्पादक

शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वर्ग केली आहे. ज्या ऊस उत्पादकांनी या पंधरवड्यात ऊस पुरवठा केला आहे, त्यांनी आपापल्या संबंधित बँकांशी संपर्क साधून आपल्या खात्यात जमा झालेल्या रकमेची खात्री करून घ्यावी.

कारखान्याने ऊस उत्पादक शेतकरी व सभासदांच्या विश्वासाला तडा जाऊ दिलेला नाही. सर्व प्रकारची देयके वेळेवर देण्याचा सातत्यपूर्ण प्रयत्न आहे. यावर्षी ऊस उत्पादकांना आर्थिक दिलासा मिळावा, यासाठी कारखाना प्रामाणिकपणे पुढाकार घेत आहे, कारखाना सुरळीत व पूर्णक्षमतेने कार्यरत असून गळिताचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी सर्व सभासद आणि शेतकरी बांधवांनी पिकविलेला सर्व ऊस गाळपासाठी कारखान्याकडे पाठवावा, असे आवाहनही संग्रामसिंह देशमुख यांनी केले आहे.

जागतिक दिव्यांग दिनानिमित्ताने साताऱ्यातून रॅली

सातारा /प्रतिनिधी:–

जागतिक दिव्यांग दिनाच्या निमित्ताने सातारा शहरात दिव्यांग प्रेरणा सामाजिक संस्थेच्यावतीने रॅली काढून आपल्या मागण्यांचे निवेदन पोलीस अधीक्षक तुषार दोशी यांना दिले. दरम्यान, रक्तदान शिबिर आणि व्याख्यानाच्या उपक्रमास जिह्यातील दिव्यांग बांधवांनी प्रतिसाद दिला. अमोल निकम, समिना शेख, अनिल ढेब यांनी उपस्थित दिव्यांगाना कसे जीवनात उभे राहायचे खचून जायचे नाही. लढायचे, असा संदेश दिला.

जागतिक दिव्यांग दिनाच्या निमित्ताने दिव्यांग प्रेरणा सामाजिक संस्थेच्यावतीने सातारा शहरातून रॅली काढण्यात आली. ही रॅली संस्थेचे अध्यक्ष अजय पवार, शहराध्यक्ष शैलेंद्र बोर्डे, प्रतापसिंहनगर विभागाचे प्रमुख बाळू ओव्हाळ, प्रहारचे जिल्हाध्यक्ष प्रशांत बगले, महिला जिल्हाध्यक्ष समिना शेख, अमोल निकम, अमोल भातुसे यांच्यासह अनेक कार्यकर्ते सहभागी झाले होते.

कार्यकर्त्यांनी छ. शिवाजी महाराजाच्या स्मारकास अभिवादन करत पुढे रॅली डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकास पोहचून तेथे अभिवादन करुन राजपथ, मोती चौक, पाचशे एक पाटी, पोलीस मुख्यालय येथे पोहचली. पोलीस मुख्यालयाच्या बाहेर घोषणा देत पोलीस अधिकाऱ्यांना खाली येवून निवेदन स्वीकारण्याची विनंती केली.

खाली आलेल्या अधिकाऱ्यांनी दिव्यांग दिनाच्या शुभेच्छा दिल्या. दरम्यान, त्यांच्याकडे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की सातारा जिह्यातील दिव्यांगाना व्यवसायासाठी २०० चौरस फुट जागा द्यावी, खेडमधील दिव्यांग लतिका जगताप यांना बेघर करणाऱ्यांच्यावर कारवाई करुन त्यांना पक्के घर देण्यात यावे, केलेले आंदोलनाचे गुन्हे मागे घेण्यात यावेत, आदी मागण्या केल्या असून त्यांचे म्हणणे ऐकून घेवून अधिकाऱ्यांनी आश्वासन दिले. तेथून रॅली शिवतीर्थ मार्गे कार्यालयावर पोहचली. तेथे अमोल निकम, समिना शेख यांच्यासह मान्यवरांनी आपल्याला मिळालेले आयुष्य हे जरी दिव्यांग म्हणून असले तरीही ते आनंदी व्यथीत करण्यासाठी रडून, दुखी कष्टी न होता.

ते लढून जिद्दीने त्यावर मात करुन पुढे जायचे. आपण जन्माने दिव्यांग असलो, आपल्याला मरण येतानाही दिव्यांग म्हणून येणार आहे. परंतु आयुष्य हे सक्षम असल्यासारखेच जगायचे. आयुष्य जगताना सकारात्मक विचार करुन आपल्या संकटांवर मात करत पुढची वाट चोखळायची आहे,असे मत त्यांनी मांडले. दरम्यान, अजय पवार यांनी आभार मानले.

सातारा : काढण्यात आलेली रॅली.

वाई तालुक्यातील आसरे गावच्या खवलाई नवलाई देवीची यात्रा ८ डिसेंबर पासून सुरु

वाई/प्रतिनिधी:–

राज्यातील हजारो भाविकांनचे श्रध्दास्थान असलेले वाई तालुक्याच्या पश्चिम भागातील खावली गावचे ग्रामदैवत जागृत असणारे देवस्थान आई खवलाई देवी नवलाईदेवी आणी वरदायिनी देवीची वार्षिक यात्रा ८ आणी ९ डिसेंबर रोजी भरणार आहे .तरी राज्यातील भाविकांनी या दोन्ही दिवशी ऊपस्थित राहुन आई चरणी नतमस्तक होऊन दर्शना लाभ घ्यावा असे आवाहन खावली ता.वाई येथील श्री नवलाई देवी व श्री रामवर्धनी देवी देवस्थान ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे

येथील यात्रा कालावधीत राज्यातील हजारो भाविक या जागृत देवींचे दर्शन घेण्यासाठी कुटुंबाच्या समवेत आपली हजेरी लावुन कुणी नवस करतो तर कुणी नवस फेडतो कोणी देवीच्या सवासनी घालतो तर कोणी

आपल्या आयुष्यात येणाऱ्या विविध प्रकारच्या अडचणींचा पाढा आईच्या चरणी वाचुन सुखी संसाराचे साकडे घालतात.येथील देवस्थान हे अतिशय जागृत समजले जाते . याचा अनुभव असंख्य भाविकांनी घेतला आहे .असा या देवस्थानचा महिमा आहे . जे जे भावीक आईच्या दरबारात स्वच्छ इच्छा शक्ती ठेवुन येतात अशा भाविकांच्या प्रापंचिक जीवनातील अडचणी दुर करण्यासाठी आई नवलाई देवी आणी रामवर्धनी देवी भाविकांच्या मनोकामना पुर्ण करतात असाही अनेक अनुभव आलेला आहे . त्यामुळे या खावली गावच्या देवस्थानचा महिमा आणी किर्ती संपूर्ण राज्यात पसरली आहे. येथील यात्रा कमिटी गाव कारभारी आणी ग्रामस्थ ग्रामपंचायत असे सर्वजण आप आपसातील मतभेद विसरून संपूर्ण गावच एकत्र येऊन गावची हि यात्रा मोठ्या दिमाखात साजरी करतात हे खावली गावच्या ग्रामस्थांनचे वैशिष्ट्य आहे. येथे येणाऱ्या कुठल्याही भाविकांची गैरसोय होऊ नये याची दक्षता यात्रा कमिटी घेत असते .

महिलांकडून विक्री केंद्राचे उद्घाटन

चरेगाव/प्रतिनिधी : –

उंब्रज, ता. कराड येथे क्रांतीज्योती महिला प्रभाग संघ अंतर्गत कोयनेश्वर महिला शेतकरी उत्पादक, कंपनी उंब्रज यांच्या संयुक्त विद्यमाने विक्री केंद्राचे उद्घाटन, तसेच नवीन लोगोचे अनावरण करण्यात आले. ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवसंजीवनी देणारा हा उपक्रम महिलांच्या उद्योजकतेची ठोस पावले मजबूत करणार आहे.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा अभियान व्यवस्थापक अंकुश मोटे, तालुका अभियान व्यवस्थापक निलेश पवार, तालुका व्यवस्थापक कुंभारदरे यांनी उपस्थित राहून नवीन विक्री केंद्राला शुभेच्छा दिल्या. प्रभाग समन्वयक माधवी वनारसे यांनी, आपल्या मार्गदर्शनाखाली या सर्व कार्यक्रमाचे नियोजन केले. उपस्थित मान्यवरांच्या मार्गदर्शनातून महिला गटांच्या कार्यक्षमतेला नवी दिशा मिळणार असून, महिलांनी स्वयंसिद्धी, आर्थिक उन्नती आणि बाजारपेठ विस्तारासाठी घेतलेली ही पुढाकाराची वाटचाल स्थानिक महिला उद्योजिकांसाठी प्रेरणादायी असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

यावेळी क्रांतीज्योती महिला प्रभाग संघाच्या पदाधिकारी, मार्तंड महिला प्रभाग संघाच्या पदाधिकारी, कोयनेश्वर महिला शेतकरी उत्पादक कंपनीचे सर्व संचालक, तसेच सर्व क्रांतीज्योती महिला प्रभाग संघ उंब्रज व मार्तंड महिला प्रभाग संघ पाल यांच्या प्रेरिका, कृषीसखी, एफ.एल.सी.आर.पी., ग्रामसंघ लिपिका, प्रभाग संघ लिपिका आणि विविध महिला समूहातील सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाल्या. महिलांनी स्वतःच्या हातांनी उत्पादित केलेल्या विविध कृषी व ग्रामीण उत्पादनांच्या विक्रीसाठी हे केंद्र मोलाचे व्यासपीठ ठरणार आहे.

याप्रसंगी संस्थेची ओळख, ध्येय आणि सामूहिक शक्तीचे प्रतीक

असलेला नव्या लोगोचे अनावरण करण्यात आले.

५३ वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन स्पर्धेत श्री शिवाजी हायस्कूल चिंचणी शाळेचे उज्ज्वल यश

कडेगांव/प्रतिनिधी:–

कडेगाव तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन देवराष्ट्रे येथील स्पर्धेत श्री शिवाजी हायस्कूल चिंचणी शाळेने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विविध नवोन्मेषी शैक्षणिक प्रकल्पांमुळे विद्यार्थ्यांनी परीक्षकांचे लक्ष वेधून घेतले.

श्री शिवाजी हायस्कूल, चिंचणी (अं.) येथील तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात मोठा गट उपकरण निर्मिती स्पर्धेत ९ वी च्या विद्यार्थी सतेज संजय पाटील, सोहम सचिन राऊत यांनी डऊ्ठ सेंसर अँड ग्रीन एनर्जी या उपकरणाचा उत्कृष्ट प्राविण्य दाखवून तृतीय क्रमांक पटकावला. विद्यार्थ्यांनी सादर केलेले प्रकल्प पर्यावरण संरक्षण, तंत्रज्ञानातील नावीन्य व दैनंदिन जीवनातील समस्यांचे वैज्ञानिक समाधान यांवर आधारित होते तसेच तालुकास्तरीय शैक्षणिक साहित्य निर्मिती गटामध्ये उच्च प्राथमिक गट सहा ते आठ मध्ये सौ. माधुरी संतोष माने यांनी द्वितीय क्रमांक मिळविला.

यावेळी विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे शाळेचे नाव जिल्ह्यात गौरवाने उंचावले आहे. या यशामध्ये विद्यार्थ्यांसोबतच मार्गदर्शक शिक्षकांचे परिश्रमही महत्वाचे ठरले. मुख्याध्याप अरुण सावत यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत म्हटले की, हे यश विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाचे आणि कठोर परिश्रमाचे फळ आहे.

यावेळी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांचे अभिनंदन गांधी एज्युकेशन सोसायटी कुंडल, संस्थेचे अध्यक्ष आ.अरुण (अण्णा)लाड, सचिव प्रकाश (भाऊ) लाड, समन्वय समितीचे सचिव किरण (तात्या) लाड, क्रांती कारखान्याचे चेअरमन शरद भाऊ लाड व संस्था प्रतिनिधी, संचालक तसेच विद्यासंकुलाचे मुख्याध्यापक अरुण सावत, पर्यवेक्षक सतीश मेटकरी, विज्ञान विभाग प्रमुख सौ.माधुरी माने, विज्ञान शिक्षक दत्तात्रय दिक्षीत, सौ. सुनिता कदम तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी या सर्वांचे मार्गदर्शन लाभले व यांनी कौतुक करुन अभिनंदन करत सत्कार करण्यात आले. या घवघवीत यशाबद्दल त्यांचे परिसरातून कौतुक व अभिनंदन करुन त्याच्या भावी वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

दिगंबरा दिगंबरा..च्या गजरात..

पान १ वरुन

व किरकोळ व्यापारी यांच्यासाठी पट्टे मारणेत आले होते.गावातील रस्त्यांची साफ सफाई, जंतुनाशक फवारणी आदी अनेक सोयी करणेत आल्या होत्या.एस टी खात्या मार्फत गर्दीचे नियोजन करणेसाठी कुरुंदवाड, सांगली, आजरा,कोल्हापूर, संभाजीनगर, कागल, चिकोडी, इचलकरंजी आदी ठिकाणाहून जादा गाड्या सोडणेत आल्या होत्या. पोलीस, गृहरक्षक दल, व्हाईट आर्मी, वजीर रेस्क्यू फोर्स व शाळा व कॉलेजच्या स्वयंसेवकांच्या सहकार्याने चोख बंदोबस्त करणेत आला होता. दत्त देव संस्थानचे विश्वस्त, ग्रामपंचायत चे सदस्य, शासकीय अधिकारी, जीवनमुक्ती संघटना कोल्हापूर, वजीर रेस्क्यू फोर्स, एस के पाटील व दत्त महाविद्यालय कुरुंदवाड व श्री दत्त विद्या मंदिर हायस्कूल चे विधार्थी स्वयंसेवकांनी तसेच दत्त देव संस्थान व ग्रामपंचायत चे कर्मचारी व स्वयंसेवकांनी अधिक परिश्रम घेऊन यात्रेचे नेटके नियोजन केले. दत्त देव संस्थानने प्रसादालयात आयोजित केलेल्या महाप्रसादाचा सुमारे पंचवीस हजार भाविकांनी लाभ घेतला.. दत्तजयंती सोहळ्यात भाविकांच्यात मोठा उत्साह दिसून येत होता.

दर्शनासाठी आलेल्या महिलांची संख्या ही लक्षणीय होती पहाटे तीन पासून रात्री उशिरापर्यंत गर्दी केली.भाविकांनी येथील प्रसिध्द पेढ्या सोबत खवा, बासुंदी, आंबा बर्फी, कवठबर्फी, करदंठ आदी मिठाई तसेच किरकोळ खरेदी साठी गर्दी केली. दत्त दर्शनासाठी आलेल्या भाविकांना व्यवस्थितरित्या दत्त दर्शन झालेने दत्त देव संस्थानचे विश्वस्त, ग्रामपंचायत चे सर्व सदस्य, पोलीस खाते, स्वयंसेवक, कर्मचारी आदींच्या सहकार्याने श्री दत्त जन्मकाळ सोहळा उत्तमरीत्या पार पडल्याचा विश्वास दत्तदेव संस्थानचे अध्यक्ष वैभव काळूपुजारी व सचिव गजानन गेंडे पुजारी सरपंच चेतन गवळी यांनी व्यक्त केला.

सुशिला बाबर यांचे निधन

वाई/प्रतिनिधी:–

वाई शहरातील नामांकित डॉ.सतीस बाबर यांच्या मातोश्री श्रीमती सुशिला बाजीराव बाबर यांचे वाई येथे दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

त्यांच्यावर सातारा तालुक्यातील जोतीबाचीवाडी त्यांच्या या मुळ गावच्या स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या अंत्ययात्रेला राजकीय सामाजिक शैक्षणिक सहकार आणी विविध क्षेत्रातील नामवंत डॉक्टर ग्रामस्थ उपस्थित होते .

दिवशी घाटातील दत्त मंदिरात दत्त जयंती उत्साहात

मल्हारपेठ/ प्रतिनिधी:–

पाटण तालुक्यातील नवारस्ता ढेबेवाडी मार्गावरील दिवशी घाटातील दत्त मंदिरात दत्त जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी सकाळपासूनच धार्मिक विधींचे आयोजन करण्यात आले होते हा उत्सव साजरा करण्यासाठी मरळी परिसरातील तसेच पाटण तालुक्याच्या कानाकोपऱ्यातील भाविक भक्तांनी एकत्र येऊन मोठे श्रम घेतले होते गेली अनेक वर्ष हे ग्रामस्थ या ठिकाणी दत्त जयंती चे भव्य आयोजन करत असतात.

पाटण तालुक्यातील प्रमुख मार्गापैकी नवा रस्ता ढेबेवाडी मार्गावरील दिवशी घाट महत्त्वाचा ठरतो या घाटात रात्री उशिरा वाहतूक तुरळक होते मात्र ढेबेवाडी विभागाला पाटण या तालुक्याच्या ठिकाणाशी जोडणारा हा प्रमुख मार्ग असल्याने या मार्गावर दिवसभरात मोठ्या प्रमाणात वाहतूक असते दरम्यान काही वर्षांपूर्वी या मार्गावरील एका ठिकाणी बारमाही पाण्याचा स्रोत निर्माण झाला तर दरडीमध्ये पिंपळ वृक्षाचे रोपटे तग धरून त्याचा वृक्ष निर्माण झाला त्याच ठिकाणी श्री दत्ताचे हे धार्मिक ठिकाण अस्तित्वात आले सुरुवातीला भाविकांनी या ठिकाणी एक छोटी प्रतिमा पूजन दत्तभक्तीची सुरुवात केली होती त्यानंतर हळूहळू या ठिकाणी दर्शन घेण्यासाठी येणाऱ्या भाविकांचा ओघ वाढू लागला तर घाटातून प्रवास करणारे अनेकांचे पाय या ठिकाणी दर्शनासाठी थांबू लागले त्यामुळे या ठिकाणाचे महत्त्व चांगलेच वाढले सध्या या ठिकाणी डोंगराच्या कपारीत दत्त मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली असून हा परिसर टप्प्याटप्प्याने सुशोभित करण्यात आला आहे या घाटात दत्त मंदिराचे अस्तित्व प्रवाशांना प्रेरणा आणि ऊर्जा देणारे ठरते त्यामुळे रात्री अपरात्री प्रवास करताना एक बळच निर्माण होत असते त्यामुळे या परिसरातील भक्ती भाव वाढीस लागला आहे.

गेल्या अनेक वर्षापासून या ठिकाणी मरळी सह परिसरातील युवक ग्रामस्थ एकत्र येऊन दत्त जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करतात यावर्षी हा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते दत्त जयंती उत्सवासाठी परिसरातील भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

दत्त मंदिरात दत्त जयंती उत्सवासाठी झालेली भाविकांची गर्दी (भगवंत लोहार)

सदर शुंभाक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारीत आहे कृपया दुरुपयोग करु नये.

नशिबाची परीक्षा
शुक्रवार ०५ डिसेंबर २०२५

मिलनम डे
उदय-अस्त सिंगल ५-९-३ मजबुत
१४० २३० ७८० — ५-१ — १२८ २९० २२७
जोड 57-41-90-36-18

कल्याणम
उदय-अस्त सिंगल १-४-७ मजबुत
१४६ ४७० ३४४ — १-० — १९० २८० ५५०
जोड 13-80-24-37-09

मुंबैम (मेन)
उदय-अस्त सिंगल ७-५-९ मजबुत
१२४ ४६७ ७०० — ७-२ — १५६ १२९ ११०
जोड 74-12-35-98-23

दिवाळी बंपर चान्सू तयार आहे संपर्क क्रमांक मो.नं. ९९७५४७९८२६

आज का अंदाज

शुक्रवार दिनांक ०५ डिसेंबर २०२५

कल्याण बाजार 'पत्थर फोड एकच'	मुंबई बाजार 'पत्थर फोड एकच'
३ - ६ - ९ - ०	३ - ४ - ७ - ८
१३९-१६९-१३५-१९०	१६६-२२०-१७९-१८९
५८०-३४९-३६०-४६०	३५५-६९९-३५९-२८८
६७०-२५९-५६८-३७०	६७०-४४६-२५०-३७८
जोडी	जोडी
३७ -६७ - ९४ - ०४	३५ -७१ - ८१ - ८१
३१ -६१ - ९८ - ०८	३९ -७० - ८० - ८०
३५ -६५ - ९२ - ०२	३६ -७२ - ८२ - ८२

जबरदस्त पास होणारे चान्सेस दि.०५-०६ डिसेंबर
प्रो.बालाजी कुमार मो.नं. ९८२२४८६०३४

शुक्रवार दिनांक ०५ डिसेंबर २०२५

सर्व बाजार साठी	१२ -	४२ -	५६ -	८६
	११ -	४४ -	५७ -	८७
	१० -	४० -	५३ -	८३
	३९९ -	१६७ -	२४९ -	१२५
	११९ -	३५६ -	३५७ -	२६०
	२९० -	२२० -	४५६ -	३५०

प्रो.बालाजी कुमार मो.नं. ९८२२४८६०३४

सर्व बाजारासाठी सोम.ते बुध.ओपन डे						सर्व बाजारासाठी सोम.ते बुध.ओपन नाईट					
१४०		४४६		१६०		४७०		२३७		२३४	
२८०	०	२६६	४	२५०	७	२८०	१	४८०	२	४५०	९
३७०		३३८		३४०		६७८		३९०		३७९	
सर्व बाजारासाठी सोम.ते बुध.क्लेज डे						सर्व बाजारासाठी सोम.ते बुध.क्लोज नाईट					
२२९		१७९		१८०		१७८		१८९		१३६	
४९०	३	३५९	७	३७९	९	३५८	६	३७८	८	३७०	०
५८०		८९०		५६८		२६८		२२४		५७८	
सर्व बाजारासाठी गुरु.ते शनि.ओपन डे						सर्व बाजारासाठी गुरु.ते शनि.ओपन नाईट					
१५६		१७८		१७०		१५९		१६०		४५०	
२३७	२	३५८	६	२६०	८	२५८	५	२५०	७	३६०	९
५७०		२७७		३५०		३५७		३४०		२७०	
सर्व बाजारासाठी गुरु.ते शनि.क्लोज डे						सर्व बाजारासाठी गुरु.ते शनि.क्लोज नाईट					
११६		१६७		२३५		६७८		१५६		१२७	
५९९	३	३५६	४	३७०	०	११९	१	४८०	२	२८०	०
२२९		६८०		४६०		२९०		३९०		३७०	

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज
० - १ - २ - ३
४

जबरदस्त पास होणारे चान्सेस दि. ०२-१२-२०२५ ०४-१२-२०२५ ०५-१२-२०२५
प्रो.बालाजी कुमार मो.नं. ९८२२४८६०३४

'कृष्णा'च्या उपक्रमांचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी केले कौतुक

कृष्णा कॅम्पसला दिली सदिच्छा भेट;कृष्णा बँकेच्या कर्ज योजनांमुळे उद्योजक,व्यवसायिकांना चालना:आ.भोसले

कराड/प्रतिनिधी : –

राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील आणि छत्रपती संभाजीनगर शिक्षक मतदारसंघाचे आमदार विक्रम काळे यांनी गुरुवारी कराडच्या कृष्णा कॅम्पसला सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी त्यांनी संस्थेच्या विविध उपक्रमांची माहिती जाणून घेत या आदर्शवत उपक्रमांचे कौतुक केले.

कृष्णा विश्व विद्यापीठाचे कुलपती डॉ. सुरेश भोसले यांनी पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांचे स्वागत केले. या भेटीदरम्यान भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ. डॉ. अतुलबाबा भोसले व सौ. गौरवी भोसले उपस्थित होते. कृष्णा बँकेच्या प्रधान कार्यालयातही मान्यवरांचे आतिथ्य करण्यात आले. यावेळी बँकेचे चेअरमन आ. डॉ. अतुलबाबा भोसले यांनी, कृष्णा आर्थिक परिवाराच्या विविध कामकाजाची आणि प्रगतीची माहिती दिली.

कृष्णा बँकेने ग्राहकहिताला प्राधान्य देत अनेक नाविन्यपूर्ण योजना राबवल्या असून, कर्जयोजनांमुळे अनेक उद्योजक व व्यावसायिकांना चालना मिळाल्याचे त्यांनी सांगितले. डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर वाढवत ग्राहकांना तंत्रसुलभ सेवा देण्याबाबत बँक कटिबद्ध असल्याचेही डॉ. भोसले यांनी नमूद केले.

कृष्णा हॉस्पिटलच्या अत्याधुनिक आरोग्यसेवा, कृष्णा विश्व विद्यापीठातील गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि सामाजिक बांधिलकीच्या अनेक उपक्रमांची माहितीही मान्यवरांना देण्यात आली. सहकारमंत्री पाटील यांनी कृष्णा समूहाच्या बहुआयामी कार्याचे कौतुक करत संस्थेच्या उज्ज्वल वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

कृष्णा हॉस्पिटलला राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी भेट दिली यावेळी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करताना कृष्णा विश्व विद्यापीठाचे कुलपती डॉ. सुरेश भोसले समवेत आ.डॉ.अतुलबाबा भोसले व इतर मान्यवर

या प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे राजेश पाटील-वाठारकर, कृष्णा बँकेचे संचालक हर्षवर्धन मोहिते, मुख्य कार्यकारी अधिकारी भगवान जाधव, जयवंतराव भोसले सहकारी पतसंस्थेचे संचालक वसीम मुल्ला, मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील, कृष्णा महिला पतसंस्थेचे व्यवस्थापक नितीन देसाई, वित्तपेटा मल्टिस्टेट सोसायटीचे व्यवस्थापक सुजीत माने, तसेच भाजपाचे राज्य परिषद सदस्य संजय पवार, मंडल अध्यक्ष शंकर निकम यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

मतपेट्या सीलबंद करण्यावर सातारा नगरपरिषद अपक्ष उमेदवारांचा गंभीर आक्षेप

प्रांताधिकाऱ्याकडे तातडीने त्रुटी दूर करण्याची मागणी

सातारा/प्रतिनिधी:–

सातारा नगरपरिषद निवडणुकीतील अपक्ष उमेदवारांनी मतपेट्या ठेवलेल्या गोदामाला सील (ड्शरश्रळपस) करण्याच्या प्रक्रियेवर तीव्र आक्षेप घेतला आहे. काल रात्री मतपेटया ठेवण्यात आलेल्या औद्योगिक वसाहतीमधील शासकीय गोदामाच्या सीलबंद प्रक्रियेत त्रुटी असल्याचा दावा करत, राम हादगे, प्रतिक भद्रे, संतोष इंदलकर, संजय पाटील आणि प्रशांत आहेरराव या अपक्ष उमेदवारांनी प्रांताधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी मा. श्री. आशिष बारकुलसाहेब यांच्याकडे अर्ज दाखल केला आहे.

अपक्ष उमेदवारांनी नमूद केले आहे की, रात्री अपरिहार्य कारणामुळे ते गोदामाजवळ उपस्थित राहू शकले नाहीत, त्यामुळे त्यांनी आपले प्रतिनिधी म्हणून ज्येष्ठ पत्रकार आणि नगराध्यक्ष पदाचे उमेदवार श्री. शरद काटकर यांना पाठवले होते. त्यांच्या माहितीनुसार, गोदामाला सील करताना उमेदवारांच्या सह्या घेण्यात आल्या नाहीत. तसेच, लावण्यात आलेले सील कधीही काढून परत लावता येऊ शकते आणि केवळ कुलूपच सीलबंद करण्यात आले आहे, असा गंभीर संशय उमेदवारांनी व्यक्त केला आहे.

'राज्यात काहीही घडू शकते' अशी भीती व्यक्त करत, या अपक्ष उमेदवारांनी मागणी केली आहे की, गोदामाच्या मुख्य दरवाज्यावर मध्यभागी मतमोजणीपर्यंत टिकेल अशा पद्धतीने सील करावे आणि त्या सीलवर त्यांच्या सह्या घेण्यात याव्यात. तसेच, त्यांच्या सह्यांचे सील गोदामाला करण्यात यावे, अशी विनंती त्यांनी प्रांताधिकार्यांना केली आहे.

मसूर सोसायटी ही आधुनिक सेवा सुविधा व तंत्रज्ञानाचे केंद्र बनेल

मानसिंगराव जगदाळे

मसूर/प्रतिनिधी:

मसूर विकास सेवा सोसायटी नं.१ ही संस्था ही केवळ एक सहकारी संस्था नाही, तर गावागावातील शेतकऱ्यांच्या जीवनात बदल घडवणारी चळवळ आहे. ही नवीन इमारत पूर्ण झाल्यावर बियाणे, खते, कीटकनाशके, कृषी अवजारे, बँकिंग सुविधा, शेतकरी मार्गदर्शन केंद्र अशा सर्व सुविधा एकाच छताखाली मिळतील. ग्रामीण भागाचा खरा विकास हा शेतकऱ्यांच्या हातात ताकद येण्याशिवाय शक्य नाही. आम्ही गेली अनेक वर्षे शेतकऱ्यांच्या सेवेत आहोत आणि पुढेही राहू.

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावणे हाच आमचा ध्यास आहे. ही इमारत केवळ वीट- सिमेंटची नाही, तर शेतकरी बांधवांच्या प्रगतीची नवी पायरी आहे. असे प्रतिपादन शिक्षण व अर्थ समितीचे सभापती व संस्थेचे मार्गदर्शक मानसिंगराव जगदाळे यांनी केले.

मसूर विकास सेवा सोसायटी नंबर एक च्या अत्याधुनिक नवीन इमारतीच्या बांधकाम युद्ध पातळीवर सुरू आहे. पहिल्या मजल्याच्या स्लॅबचे कॉंक्रिटीकरण संस्थेचे मार्गदर्शक मानसिंगराव जगदाळे यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत झाला त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी सह्याद्री सहकारी साखर कारखान्याचे संचालक तथा संस्थेचे सचिव दिनकर शिरतोडे, माजी सरपंच प्रकाश माळी, माजी उपसरपंच विजयसिंह जगदाळे, सोसायटीचे उपाध्यक्ष अभिजीत घाडगे, महेश घाटगे, रमेश जगदाळे, सिकंदर शेख, जमीर मुल्ला, विकास पाटोळे, वसंत पाटोळे, संदीप शितोळे, जितेंद्र निकम, धैर्यशील कांबीरे, शहजादे पिरजादे, समीर मसुरकर, संतोष बरकडे यांच्यासह संस्थेचे संचालक, पदाधिकारी आणि शेतकरी सभासद उपस्थित होते.

जगदाळे पुढे म्हणाले, आजच्या स्पर्धेच्या युगात शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान आणि माहितीची गरज आहे. ही इमारत त्याच दिशेने टाकलेले पाऊल आहे. येथे डिजिटल सुविधा, शेतकरी प्रशिक्षण केंद्र आणि युवकांसाठी कौशल्य विकास कक्षही सुरू होणार आहेत. मसूर व मसूर परिसरातील शेतकऱ्यांचे भविष्य उज्ज्वल करणे हेच आमचे एकमेव ध्येय आहे.

सचिव दिनकर शिरतोडे म्हणाले, ही इमारत शेतकऱ्यांचे योगदानातून उभी राहत आहे. पुढील काही महिन्यांत ही इमारत पूर्णपणे कार्यान्वित होईल. सर्व संचालक आणि शेतकरी सभासद यांनी या कामाला मनापासून साथ देत आहेत. आजच्या या सोहळ्याने संस्थेच्या कामाला नवी ऊर्जा मिळाली आहे. ही इमारत कराड तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी एक आदर्श सहकारी केंद्र बनेल, .

चेअरमन शहाजीराव जगदाळे यांनी स्वागत केले सूत्रसंचालन व आभार सचिव दिनकर शिरतोडे यांनी मानले.ही नवी इमारत पूर्णत्वास गेल्यावर मसूर व परिसरातील शेतकऱ्यांना शेतकऱ्यांना मिळणाऱ्या सुविधांमध्ये मोठी क्रांती होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

मसूर विकास सोसायटी नंबर १ च्या पहिल्या मजल्याच्या स्लॅबचे उद्घाटन करताना मानसिंगराव जगदाळे समवेत मान्यवर

पदवीधर,शिक्षक मतदार संघातील प्रारुप मतदार याद्या प्रसिद्ध

प्रांत सोपान टोम्पे: याद्यांवरील हरकती व आक्षेपसाठी १८ डिसेंबरपर्यंत मुदत

पाटण/प्रतिनिधी:–

तालुक्यातील पदवीधर व शिक्षक मतदारांच्या प्रारूप मतदार याद्या बुधवार ३ डिसेंबर रोजी प्रसिद्ध करण्यात आल्या. या याद्यांवरील हरकती व आक्षेप १८ डिसेंबरपर्यंत स्वीकारण्यात येणार आहेत. दरम्यान, पाटण तालुक्यात पदवीधर आणि शिक्षक निवडणुकीसाठी एकूण १६ मतदान केंद्र असल्याची माहिती उपविभागीय अधिकारी सोपान टोम्पे यांनी पत्रकार परिषदेत दिली. पत्रकार परिषदेस तहसीलदार अनंत गुरव व नायब तहसीलदार रवींद्र सावंत हे उपस्थित होते.

टोम्पे पुढे म्हणाले पदवीधर आणि शिक्षक मतदारांकडून ऑनलाईन तसेच ऑफलाईन प्राप्त झालेल्या अर्जाच्या आधारे प्रारूप मतदार यादी तयार करण्यात आली आहे.

पदवीधर मतदार यादी तालुक्यातील अकरा मतदान केंद्रांवर, तर शिक्षक मतदार यादी पाच ठिकाणी पाहण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. दरम्यान याद्यांमध्ये जर काही हरकती किंवा आक्षेप असल्यास नागरिकांनी ३ डिसेंबर ते १८ डिसेंबर या कालावधीत दावे-हरकती नोंदवाव्यात. प्राप्त हरकतींचा ५ जानेवारी रोजी निकाल लावून पुरवणी यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. तसेच दोन्ही मतदार याद्या १२ जानेवारी रोजी अंतिमरित्या प्रसिद्ध होतील. अशी माहिती टोम्पे यांनी दिली.

१६ मतदान केंद्रांचा समावेश

पदवीधर आणि शिक्षक मतदार केंद्रासाठी पाटण तालुक्यात एकूण १६ मतदान केंद्रे असून, त्यापैकी पदवीधर मतदारसंघासाठी ११ व शिक्षक मतदारसंघासाठी ५ मतदान केंद्रे आहेत. पदवीधरसाठी हेळवाक, पाटण (२), तारळे, मल्हारपेठ (३), चाफळ, ढेबेवाडी (२), तळमावले अशा ११ व शिक्षकसाठी पाटण (२), मल्हारपेठ, ढेबेवाडी, तारळे अशा ५ मतदान केंद्रांचा समावेश आहे.

पदवीधर साठी ४८२६ तर शिक्षकांसाठी ५८८ मतदारांची नोंद

❊ पदवीधर मतदार यादीत एकूण- ४८२६ मतदारांचा समावेश आहे पैकी पुरुष- ३१०१ तर महिला- १७२५ मतदारांची संख्या आहे. ❊ शिक्षक मतदार यादीत एकूण- ५८८ मतदारांचा समावेश आहे. पैकी पुरुष - ३८८ तर महिला- २०० मतदारांची संख्या आहे.

साताऱ्यातून दुचाकीची चोरी

सातारा/प्रतिनिधी:–

सातारा येथील शनिवार पेठ परिसरात चोरट्यांनी पुन्हा एकदा धाड टाकत प्रथमेश प्राईड अपार्टमेंटच्या पार्किंगमध्ये उभी असलेली १५ हजार रुपये किमतीची हीरो स्प्लेंडर मोटरसायकल लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. याबाबतची नोंद सातारा शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. ही घटना २८ नोव्हेंबर रोजी रात्री सुमारे दहा वाजून पंचेचाळीस मिनिटांच्या सुमारास घडली. या प्रकरणी माधव एकनाथ राठोड (वय ३५, रा. क्षेत्र माऊली) यांनी शाहूपुरी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. अज्ञात चोरट्याने पार्किंगमधून मोटरसायकल चोरून नेली असल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

दिगंबरा, दिगंबरा..श्रीपाद वल्लभ दिगंबरा..या दत्त मंत्राचा जयघोष

धार्मिक वातावरणात दत्तजयंती उत्सव मोठ्या उत्साहात संपन्न

सातारा/प्रतिनिधी:–

दिगंबरा, दिगंबरा.. श्रीपाद वल्लभ दिगंबरा.. या दत्त मंत्राचा जयघोष करत सालाबाद प्रमाणे मार्गशीर्ष महिन्यातील शुक्ल पक्षातील पौर्णिमेला श्री दत्तात्रेय जयंती उत्सव साजरा केला जातो

गुरुवारी सायंकाळी सूर्यास्ताच्या मुहूर्तावर हा दत्तजन्म सोहळा मोठ्या उत्साहात संपूर्ण जिल्ह्यात ठिकठिकाणी मंदिरातून.. अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त.. दिगंबरा, दिगंबरा, श्रीपाद वल्लभ दिगंबरा.. च्या जयघोषात साजरा करण्यात आला. प्रतिवर्षाप्रमाणे मार्गशीर्ष महिन्यात या दत्त जयंती सोहळ्या अगोदर सात दिवस दत्तात्रय भगवानाचे चरित्र अर्थात श्री गुरुचरित्र पठण पारायण स्वरूपात घरोघरी तसेच सामुदायिक रीतीने करण्याची प्रथा आहे

मागील शुक्रवारपासून या गुरुचरित्र वाचन पारायण सोहळ्यात सुरुवात झाली ,व आज या सप्ताहाची सांगता दत्तजन्माने करण्यात आली. सातारा शहरातील प्रतापगंज पेठेतील श्री मुतालिक दत्त मंदिरात यानिमित्त तीन दिवसांचा दत्तजन्म उत्सव मोठ्या उत्साहात संपन्न होत आहे. आज सायंकाळी सूर्यास्ताच्या मुहूर्तावर ५ वाजून ५९ मिनिटांनी दत्तजन्मोत्सव साजरा करण्यात आला. यानिमित्त मंदिराला विविध आकर्षक फुलांची तसेच केळीचे आणि नारळाच्या पानांची सजावट करण्यात आली.मंदिरातील संगमरवरी दत्तमूर्तीला अतिशय सुरेख असे गुलाब आणि शेवंती पुष्पांचे हार घालून फुलांची सजावट करण्यात आली होती. दिवसभर साबुदाणा खिचडी चा प्रसाद हातात वितरण करण्यात येत होता. भक्तांनी सकाळपासूनच दर्शनासाठी गर्दी केली होती.

या मंदिरात दत्त जयंती सोहळ्यानिमित्त बुधवारी सायंकाळी ११ ब्रह्मवृद्धांच्या उपस्थितीत मंत्र जागर करण्यात आला तसेच गुरुवारी सकाळी दत्त जयंती दिवशी सकाळी दत्त मूर्तीला विशेष पंचामृत स्नान, महाअभिषेक आणि पूजा संपन्न झाल्यावर मंदिरात ब्रह्मवृंदांनी दत्तयाग संपन्न केला .दिवसभर दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी होती. सायंकाळी ५ पाच ते ७ या वेळेत वेदमूर्ती गोविंदशास्त्री जोशी यांचे जन्मकाळा निमित्त प्रवचन संपन्न झाले. आणि रात्री ८ ते ९ या वेळेत अरविंद कुलकर्णी यांची दत्त भक्तीगीते आणि अभंगवाणी हा सुश्राव्य गायन कार्यक्रम संपन्न झाला. शुक्रवारी सकाळी लघुरुद्राने या दत्त जन्मोत्सव तीन दिवशीय सोहळ्याची सांगता होणार आहे अशी माहिती वेदमूर्ती मयूरशास्त्री मेढेकर व श्री .जोशी गुरुजी यांनी दिली. आज दिवसभर सकाळपासून रात्री उशिरापर्यंत मंदिरात भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. आकर्षक विद्युत रोषणाई मुळे मंदिराला विशेष रूप प्राप्त झाले होते .मंदिराच्या पुढे आकर्षक सजावट आणि कमान स्वागतासाठी बांधण्यात आली होती.

सातारा शहरातील माची पेठेतील टोपे मामा दत्त मंदिर ,पोलीस केंद्र पुढील आनंदवाडी दत्त मंदिर तसेच संगमनगर आणि शहरातील विविध मंदिरात दत्त जयंती सोहळा मोठ्या उत्साहात सायंकाळी संपन्न झाला. गेंडामाळ शाहूपुरी परिसरातील श्री दत्त भक्त मंडळाचे वतीने तीन दिवसांचा विविध कार्यक्रम आयोजित केला असून यामध्ये भजन, प्रवचन, कीर्तन, दत्त जन्मकाळ साजरा करण्यात आला. सातारा जिल्हा नजीकच्या श्रीक्षेत्र नारायणपूर येथेही दत्तभक्तांनी एकमुखी दत्त मंदिरात हा जन्मसोहळा मोठ्या उत्साहात संपन्न केला. सातारा येथून खास दत्त जयंती निमित्त अक्कलकोट गाणगापूर, नरसोबाची वाडी, नारायणपूर, श्रीक्षेत्र गोंदावले येथे विशेष एसटी बसेस भक्तांच्या सोयीसाठी सोडण्यात आल्या होत्या.

सायंकाळी दत्तजन्म सोहळा झाल्यावर महाआरती होऊन प्रसाद वितरण करण्यात आला. अनेक दत्त मंदिरात यानिमित्त महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले होते. सातारा जिल्ह्यातील विविध एसटी आगारात असलेल्या श्री दत्त मंदिरातही भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. तसेच अनेक एसटी कर्मचाऱ्यांनी विशेष वर्गणी काढून येथे महाप्रसादाचे आयोजन केले होते. सातारा जिल्ह्यातील श्री क्षेत्र गोंदवले येथील ब्रह्मचैतन्य महाराज गोंदवलेकर यांचा पुण्यतिथी महोत्सव शुक्रवारपासून उत्साहात प्रारंभ होत आहे . यानिमित्त गोंदावले येथील दत्त मंदिरातही भाविकांनी मोठी गर्दी केली होती. सातारा जिल्ह्यातील लोणंद येथील श्री ढाळे परिवाराच्या दत्त मंदिरातही मंदिरात भाविकांची मोठी गर्दी होती.भजन, कीर्तन, प्रवचन, अखंड जागर आणि दत्तधुन तसेच दत्त स्मरण करणारी भावगीते भक्ती गीते म्हणत दत्तभक्तांनी हा जन्म सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न केला.

सातारा शहरातील प्रतापगंज पेठेतील श्री मूतालिक दत्त मंदिरात दत्त जयंती सोहळ्यानिमित्त तीन दिवसांचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले असून जयंतीनिमित्त मंदिराला फुलांची आकर्षक सजावट तसेच विद्युत रोषणाई करण्यात आली होती मंदिरातील दत्त मूर्तीला पहाटे महा अभिषेक करून फुलांच्या हारांनी सजवण्यात आले होते.फोटो ..अतुल देशपांडे ,सातारा.

पोलीस कॉन्स्टेबल सचिन लावंड यांचे निधन

सातारा/प्रतिनिधी:–

सातारा जिल्हा पोलीस दलातील कॉन्स्टेबल सचिन लावंड यांचं नुकतंच अल्पशा आजाराने निधन झालं. त्यांच्या व्हॉट्सप स्टेटसवर स्वतःच्या फोटोसह ठेवलेलं स्टेटस व्हायरल झाल्यानंतर आश्चर्य व्यक्त केलं जात आहे.

याबाबत अधिक माहिती अशी, सातारा जिल्हा पोलीस दलात कॉन्स्टेबल म्हणून कार्यरत असलेले सचिन लावंड (रा. दरूज, ता. खटाव) यांचं अल्पशा आजाराने दि २ रोजी निधन झाले. त्यांच्या स्वतःच्या फोटोसह व्हॉट्सप स्टेटसवर

'सावडणे विधी ४/१२/२०२५ रोजी सकाळी ८ वाजता आहे' असं लिहिलं होतं. हे स्टेटस व्हायरल झाल्यानंतर सहकाऱ्यांनी चौकशी केली असता लावंड यांच्या निधनाची बातमी खरी असल्याचं समजले. त्यांना काविळ झाली होती आणि उपचारादरम्यान त्यांची प्रकृती खालावल्याने त्यांचे निधन झाल्याची माहिती समोर आली. कावीळ झाल्याने त्यांना खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते, उपचार झाल्यानंतर त्यांना घरी सोडण्यात आले मात्र पुन्हा त्यांची प्रकृती खालावल्याने जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते, जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार सुरू असताना त्यांचं निधन झालं. सचिन लावंड हे सातारा पोलीस मुख्यालयातून काही दिवसांपूर्वीच पुसेगाव पोलीस ठाण्यात बदली होऊन आले होते. नवीन ठिकाणी रुजू होऊन अवघ्या चार दिवसांतच ते आजारी रजेवर गेले होते. रजेवर असतानाच त्यांना काविळ झाल्याचं निदान झालं. काविळ संपूर्ण शरीरात पसरल्याने त्यांची प्रकृती अधिकच गंभीर झाली होती आणि उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. सचिन लावंड यांच्या निधनाने पोलीस दलात हळहळ व्यक्त होत आहे.

कर्जबुडव्या साखर ..

पान १ वरुन संस्थांच्या लेखापरीक्षणात 'अ वर्ग' शेरा असतानाही गैरव्यवहार उघड होत असल्याबाबत विचारलेल्या प्रश्नावर ते म्हणाले, लेखा परीक्षकांना जबाबदार धरण्याचा कायदा करण्याचे काम सुरू आहे. नागरिकांकडूनही सूचना मागविल्या असून, नवीन कायदा मजबूत आणि कडक असेल, असे त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबाबत बोलताना सहकारमंत्री म्हणाले, कर्जमाफी संदर्भात विधानसभेत मुख्यमंत्र्यांनी कोणीही भाष्य करू नये, अशा सूचना दिल्या आहेत. त्यामुळे त्यावर टिप्पणी करणे उचित नाही. मात्र कर्जमाफीसाठी ३० जूनची अंतिम मुदत देण्यात आली असून, सरकार त्या कालावधीत निर्णय घेईल. कर्जमाफीचा सहकार खात्यावर होणारा परिणाम, तसेच किती कर्जदार थकबाकीत आहेत, याचे अचूक आकडे गोळा करण्याचे काम सुरू आहे.

जाहीर नोटीस

कराड येथील मे.सि.ज.ज्यु.डी.सो,यांचे कोर्टात

वारस किरकोळ न्या. अर्ज नं. १२४/२०२५

नि.६

विश्वनाथ दादासो पावणे
वय. ४२, धंदा. आर्मी सेवानिवृत्त
रा. कालवडे, ता. कराड, जि. सातारा. — अर्जदार

विरुध्द

कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार हे वर नमूद पत्त्यावरील कायमचे रहिवाशी असून अर्जदार यांचे वडील कै. दादा ऊर्फ दादासो बिरु पावणे हे दि. १४/१२/२०२२ रोजी व कै. तारुबाई दादा पावणे या दि. १०/०६/२०२१ रोजी मयत झाले आहेत. सदरील कै. दादा ऊर्फ दादासो बिरु पावणे व कै. तारुबाई दादा पावणे यांना अर्जदार हे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार व्यतिरिक्त इतर कोणीही वारस नाहीत, कै. दादा ऊर्फ दादासो बिरु पावणे यांचे हयातीत कर्मचारी भविष्य निधि संगठन अंतर्गत कामगार पेन्शन योजना १९९५ अंतर्गत मासिक पेन्शन पिपिओ नंबर PUKOL/13406 प्रमाणे बँक ऑफ इंडिया शाखा कोळे (कराड) बचत खात्यात र.रु. ४५,४००/- जमा आहे. सदरचे खात्यास नॉमिनी म्हणून त्यांची पत्नी तारुबाई दादा पावणे यांचे नाव लावलेले होते. परंतु सदरील कै. तारुबाई दादा पावणे ही दि. १०/०६/२०२१ रोजी मयत झालेले आहेत. अर्जातील वरील नमूद रक्कमेबाबत कर्मचारी भविष्य निधि संगठन अंतर्गत कामगार पेन्शन योजना कोल्हापूर यांचेकडे मागणी करणेसाठी अर्जदार हे कर्मचारी भविष्य निधि संगठन अंतर्गत कामगार पेन्शन योजना कोल्हापूर येथे गेले असता सदरील कार्यालयाने अर्जदार यांना मे. कोर्टाचे वारसा प्रमाणपत्र हजर करणेबाबत दि. १७/०९/२०२५ रोजी पत्र दिलेले आहे. त्यामुळे अर्जदार यांना प्रस्तुतचा अर्ज या मे. कोर्टात दाखल करणे भाग पडले आहे. त्यामुळे अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज वारस दाखला (Succession Certificate) मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

त्याअर्थी वरील अर्जाबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असलेस त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेनंतर ३० दिवसांचे आत अगर दि. ९/१/२०२६ रोजी स्वतः अगर माहितगार इसमामार्फत या अर्जाचे कामी हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात. या तारखेस कोणी हजर न झालेस अर्जदार यांचे मागणीप्रमाणे त्यांना वारसा दाखला (Succession Certificate) देणेत येईल मग त्याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. आज दि. ४ माहे १२. सन २०२५ रोजी आमचे सहीनिशी व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी ही जाहीर नोटीस दिली असे.

सही/-
श्री.व्ही.एस.शिंदे
अधिक्षक,
दिवाणी न्यायालय,कनिष्ठ स्तर,
कराड

दै.प्रीतिसंगम दि. ०५.१२.२०२५

NAME CHANGS

MY OLD NAME WAS IMAMSAB NABISAB MAKANDAR AND MY NEW NAME IS IMAMSHA. NABISHA MAKANDAR

MY OLD NAME WAS MAMATAJ MAHIBOOBASAB. MAKANADAR AND MY. NEW NAME IS MUMTAJ. IMAMSAB MAKANDAR

जाहीर समन्स

मा.न्यायाधीश सहकारी न्यायालय,सातारा यांचे कोर्टात

को.के. नं. २०/२०२४

श्री लक्ष्मीदेवी नागरी सहकारी पत संस्था म. फलटण जि. सातारा — वादी

विरुध्द

१) महिबुब सुलेमान खान
३) सौ रेहाना अहमद खान
रा. हडको कॉलनी फलटण — प्रतिवादी

वादी तर्फे ॲड. के.बी.शिंदे

दावा रक्कम रु.९७१२९/-

ज्या अर्थी वादींनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९१ अन्वये रक्कम वसुलीसाठी दावा दाखल केलेला आहे. त्याअर्थी तुम्हास दाव्यातील पत्त्यावर समन्स रजि. पोस्टाने पाठविले होते परंतु तुम्हास समन्स रुजु झाले नाही. म्हणुन समन्स बजावले नाही.

तरी या जाहीर समन्सने तुम्हास प्रतिवादी नं. ३ यांना कळविणेत येते की दाव्याचे कामकाज दिनांक १८/१२/ २०२५ रोजी सकाळी ठीक ११-०० वाजता नेमले आहे. तरी तुम्ही सदर दिवशी सहकार न्यायालय सातारा ५२४/१ ब सदरबझार सातारा सातारा-कोरेगाव रस्ता येथे वैयक्तिक अगर वकीला मार्फत हजर रहावे. हजर न राहिल्यास आपणास या बाबत काही म्हणणे देणेचे नाही असे समजून दाव्याचा निकाल आपल्या अपरोक्ष एकतर्फी केला जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २५ माहे ०९ सन २०२५ रोजी आमर्च सहीशिक्क्यानिशी दिली.

मा. न्यायाधीश यांचे हुकुमावरुन
सही/-
(श्री सी.डी. चव्हाण)
न्यायालयीन लिपीक
सहकारी न्यायालय, सातारा

जाहीर समन्स

मा.न्यायाधीश सहकारी न्यायालय,सातारा यांचे कोर्टात

को.के.नं. ३/२०२४

श्री लक्ष्मीदेवी नागरी सहकारी पत संस्था म. फलटण जि. सातारा — वादी

विरुध्द

१) सुर्दशन सुभाष जगताप
२) सचिन सुभाष जगताप रा. साखरवाडी ता. फलटण
४) सौ द्वारका बाळासो तावरे
रा. विद्यानगर ता.फलटण जि.सातारा — प्रतिवादी

वादी तर्फे ॲड. पटेल आय. आर

दावा रक्कम रु.११४०८३/-

ज्या अर्थी वादीनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९१ अन्वये रक्कम वसुलीसाठी दावा दाखल केलेला आहे. त्याअर्थी तुम्हास दाव्यातील पत्त्यावर समन्स रजि. पोस्टाने पाठविले होते परंतु तुम्हास समन्स रुजु झाले नाही. म्हणुन समन्स बजावले नाही.

तरी या जाहीर समन्सने तुम्हास प्रतिवादी नं. २ व ४ यांना कळविणेत येते की दाव्याचे कामकाज दिनांक १८/१२/ २०२५ रोजी सकाळी ठीक ११-०० वाजता नेमले आहे. तरी तुम्ही सदर दिवशी सहकार न्यायालय सातारा ५२४/१ ब सदरबझार सातारा सातारा कोरेगाव रस्ता येथे वैयक्तिक अगर वकीला मार्फत हजर रहावे. हजर न राहिल्यास आपणास या बाबत काही म्हणणे देणेचे नाही असे समजून दाव्याचा निकाल आपल्या अपरोक्ष एकतर्फा केला जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २५ माहे ०९ सन २०२५ रोजी आमचे सहीशिक्क्यानिशी दिली.

मा. न्यायाधीश यांचे हुकुमावरुन
सही/-
(श्री सी.डी. चव्हाण)
न्यायालयीन लिपीक
सहकारी न्यायालय, सातारा

आज बाळाचा पहिला वाढदिवस

आमचं विश्व तू,
आमचं सुख तू
आनंदाचा क्षण तू,
जगण्याची आशा तू
आमच्या सर्वांची लाडकी ईशान्वी

ईशान्वी सुरज काटकर

तुला वाढदिवसाच्या खूप शुभेच्छा

शुभेच्छुक
पप्पा-मम्मी,आजी-आजोबा,मामा-मामी,आत्या,श्रेयांश, अयांश,पवन, संभव.

समस्त सूर्यवंशी,काटकर परिवार